


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक ९५ * नांदेड * शनिवार, दि. ११ एप्रिल २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211

# आसाममध्ये ऐतिहासिक विक्रमी ८५.९१ टक्के मतदानाची नोंद

## पुदुचेरीमध्ये जवळपास ९० टक्के अन् केरळमध्ये १९८७ नंतरचे सर्वाधिक मतदान

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** विधानसभा निवडणुकीसाठी आसाम व केरळ या दोन राज्यांमध्ये आणि पुदुचेरी या केंद्रशासित प्रदेशात मोठ्या प्रमाणात मतदान झाले. १९५० मध्ये आसामची निर्मिती झाल्यापासून राज्यात ८५.९१ टक्के मतदानाची नोंद झाली, जे आतापर्यंतचे सर्वाधिक मतदान आहे. यापूर्वीचा विक्रम २०१६ मध्ये ८४.७ टक्के होता. पुदुचेरीमध्ये स्वातंत्र्यानंतरचे सर्वाधिक ८९.८७ टक्के मतदान झाले. यापूर्वीचा विक्रम ८५ टक्के होता.

केरळमध्ये १९८७ नंतरचे सर्वाधिक ७८.२७ टक्के मतदान झालं आहे. मतदानाच्या टक्केवारीची ही आकडेवारी १० एप्रिल रोजी संध्याकाळी ८ वाजेपर्यंतची आहे. निवडणूक आयोगाने अद्याप अंतिम आकडेवारी जाहीर केलेली नाही. आसाममधील १२६ जागांवर ४१ पक्षांच्या ७२२ उमेदवारांचे भवितव्य ठरणार आहे. ३५ पैकी २६ हून अधिक जिल्ह्यांमध्ये ८० टक्क्यांपेक्षा जास्त मतदान झाले. दक्षिण सालमारा मानकाचर जिल्ह्यात सर्वाधिक ९५.५६ टक्के मतदान झाले. पश्चिम कार्बी आंगलोंगमध्ये सर्वात कमी ७५.२५ टक्के मतदान झाले. केरळमध्ये १४० विधानसभा जागांवर २६ दशलक्ष मतदार आहेत. यावेळी ८८३उमेदवारांनी निवडणूक लढवली. राज्यातील १४ जिल्ह्यांपैकी दोन जिल्ह्यांमध्ये ८० टक्क्यांपेक्षा जास्त मतदान झाले. दहा जिल्ह्यांमध्ये ७० टक्क्यांपेक्षा जास्त मतदान झाले. कोझिकोडमध्ये सर्वाधिक ८१.३२ टक्के मतदान झाले. पथानामथिट्टामध्ये सर्वात कमी ७०.७६ टक्के मतदान झाले. केरळमध्ये २.७१ कोटी मतदार ८९० उमेदवारांमधून आपल्या नेत्याची निवड करत आहेत.

सीपीआय(एम) नेते सी.एन. मोहनन म्हणाले की, जे लोक मरण पावले आहेत किंवा दुसरीकडे राहायला गेले आहेत, त्यांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत. त्यामुळे मतदानाची टक्केवारी वाढली. भाजप नेते के.एस. शैजू म्हणाले, आमच्या विश्लेषणानुसार, यावेळी अधिक महिला मतदारांनी मतदान केले आहे.

## रशियाकडून युद्धविरामाची घोषणा; दोन दिवस युक्रेनवर हल्ले नाही

**मॉस्को (वृत्तसंस्था)–** अमेरिका आणि इराण यांच्यात दोन आठवड्यांसाठी युद्धविरामाची घोषणा झाल्यानंतर आता, रशियाने देखील युक्रेनविरोधातील युद्धात दोन दिवसांच्या युद्धविरामाची घोषणा केली आहे.

रशियाच्या परराष्ट्र मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या माहितीनुसार, रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी ऑर्थोडॉक्स इस्टरनिमित्त दोन दिवसांच्या कालावधीसाठी युद्धविरामाची घोषणा केली आहे. युक्रेनने देखील युद्धविरामाचे पालन करावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे. रशियाच्या परराष्ट्र मंत्रालयाने एक्सवर याबाबत माहिती दिली आहे. मंत्रालयाने जाहीर केल्यानुसार, ऑर्थोडॉक्स इस्टरच्या येऊ घातलेल्या सणाच्या निमित्ताने, ११ एप्रिल रोजी दुपारी चार वाजल्यापासून ते १२ एप्रिल रोजी दिवसअखेरपर्यंत युद्धविराम जाहीर करण्यात येत आहे, असे क्रेमलिनच्या घोषणेत म्हटले आहे. युक्रेन देखील रशियन फेडरेशनचे अनुसरण करेल, या आधारावर आम्ही पुढे जात आहोत, असेही क्रेमलिनकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# तीन दिवसांपासून नांदेडात मुक्कामी असलेल्या अंदाज समितीला प्रशासनाकडून निरोप

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात तीन दिवसांपासून मुक्कामी असलेल्या अंदाज समितीला शुक्रवार, दि. १० एप्रिल रोजी दुपारी जिल्हा प्रशासनाकडून निरोप देण्यात आला. शुक्रवारी अंदाज समितीचे सदस्य जिल्ह्याच्या दौऱ्यावर गेले नाहीत. त्यामुळे प्रशासनासह अनेकांनी निःश्वास सोडला.

अंदाज समितीचे अध्यक्ष आ. अर्जुन खोतकर यांच्यासह आमदारांनी बुधवारी पहिल्या दिवशी विविध विभागांचा नियोजन भवनात आढावा घेतला. दुसऱ्या दिवशी गुरुवारी सकाळी नियोजन भवनात आढावा घेऊन भोजनानंतर कोणालाही न सांगता भोकर, सगरोळी घाटावर धडक मारली. यावेळी अवैध रेती उपसा व वाहतूक लक्षात घेऊन बिलोलीच्या उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे, तहसीलदार गजानन शिंदे यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश अंदाज समितीचे अध्यक्ष आ. खोतकर यांनी दिले. रात्री उशिरा अंदाज समिती सगरोळीवरून नांदेडला आली.

गुरुवारी दुपारनंतर अंदाज समितीने जिल्ह्यात दौरा करून उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांच्यावर कारवाई झाल्याने शुक्रवारी सकाळपासूनच जिल्हा 'अलर्ट' झाला होता. प्रशासनासह अनेकांनी धास्ती घेतली होती. काही जणांनी अंदाज समिती जिल्ह्यात कोठे जाणार आहे?, कोणत्या तालुक्यात जाईल, कुठे भेट देणार, याची माहिती घेत होते.

शुक्रवारी सकाळपासून अंदाज समितीचे अध्यक्ष आ. खोतकर हे विश्रामगृहावर आढावा घेतल्यानंतर नियोजन भवनात दाखल झाले. विविध विभागासह जिल्हा परिषदेच्या विविध विभागांचा आढावा घेतला. त्यानंतर दुपारी १ च्या सुमारास नांदेड जिल्हा प्रशासनाच्यावतीने अंदाज समितीला निरोप देण्यात आला.

# पोलिसांच्या कोम्बिंग ऑपरेशनमध्ये चार दिवसांत ९० आरोपींची तपासणी

## नाकाबंदी व गस्तीसाठी एसपी अबिनाश कुमार दुचाकीवर



**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरात गँगवारमधून पाच खुनांच्या घटना घडल्यानंतर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी शहरात मोठ्या प्रमाणात कोम्बिंग ऑपरेशन सुरू केले आहे. यामध्ये जवळपास ९० आरोपींची तपासणी करण्यात आली आहे. येणाऱ्या काळातही अशाच प्रकारची पोलिसांची गस्त आणि नाकाबंदी कायम राहणार असल्याचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सांगितले.

नांदेड शहरांमध्ये नुकत्याच झालेल्या पाच खुनाच्या घटनेनंतर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याची चर्चा शहरभर पसरली. परंतु पोलिसांनी झालेल्या खुनातील मारेकऱ्यांना तत्काळ अटक केली. डी मार्ट ई-स्केअर परिसरातील झालेल्या खुनातील आरोपी, त्यानंतर वजिराबाद भागात मुरमुरा गल्लीत झालेल्या खुनातील आरोपी आणि सोनू कल्याणकर खुनातील मारेकरी सध्या पोलीस कोठडीत आहेत. या तिन्ही प्रकरणांतील काही फरार आरोपींना पकडण्यासाठी पोलिसांच्या टीम वेगवेगळ्या भागात रवाना करण्यात आल्या आहेत. सोनू कल्याणकर याच्या खून प्रकरणात कटात सहभागी असलेला व सध्या कारागृहात असलेला गोलू मंगनाळे याच्या आईलासुद्धा आरोपी करण्यात आल्याचेही सांगण्यात आले आहे.

दि. ६ एप्रिलपासून ते १० एप्रिलपर्यंत चार दिवसांत पोलिसांनी शहरात नाकाबंदी आणि गस्त घालण्यावर भर दिली. यात स्वतः पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्यासह अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, सहायक पोलीस अधीक्षक शशांथ गौडा, परीविक्षाधीन सहायक पोलीस अधीक्षक वैभव पडवळ यांच्यासोबतच उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा आणि शहरातील सर्व ठाणेदार असे ३९ अधिकारी व ११९ कर्मचारी या मोहिमेमध्ये कार्यरत आहेत. यादरम्यान कलम ५५ आणि ५६ तडीपार करण्यात आलेल्या ६७, अंतर्गत गुन्हे दाखल असलेले २३, सराईत गुन्हे करणारे १९ आणि भारतीय हत्यार कायद्यांतर्गत गुन्हे दाखल असलेल्या १५ आरोपींची तपासणी करण्यात आली आहे. चार दिवसांत तब्बल ९० आरोपींची तपासणी करून कांहीवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# मथुरेत ३० जणांना घेऊन जाणारी बोट उलटली; १० जणांचा मृत्यू, अनेकजण बेपत्ता

**मथुरा (प्रतिनिधी)–** उत्तर प्रदेशातील मथुरेत यमुना नदीत एक बोट (स्टीमर) उलटल्याची घटना घडली आहे. या अपघातात १० जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. तर १० ते १२ लोक बेपत्ता असल्याची माहिती देखील मिळत आहे.

अपघाताबाबत जिल्हाधिकारी चंद्र प्रकाश सिंह यांनी दिलेल्या माहितीनुसार, दुपारी २ वाजून ४५ मिनिटांनी यमुना नदीत एक अत्यंत दुर्दैवी घटना घडली. लुधियानाहून ३० लोक बोटीने प्रवास करत होते. यावेळी केसी घाटाजवळ ही बोट उलटली. यामध्ये १० जणांचा मृत्यू झाला आहे. या ठिकाणी बचावकार्य सुरु केल्याची माहितीही त्यांनी दिली आहे. लोकांचा जीव वाचवण्याला आमचे प्राधान्य आहे. रुग्णालयांनाही सतर्क करण्यात आले आहे. रामकृष्ण मिशन रुग्णालय हे आमचे सर्वात मोठे रुग्णालय असून, आम्ही तेथे हाय अलर्ट जारी केल्याची माहिती त्यांनी दिली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि प्रशासकीय पथके घटनास्थळी दाखल झाली होती.

# देशात गॅस पुरवठा सुरळीत; इराण युद्धविरामानंतर केंद्र सरकारचा खुलासा

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** इराणमधील युद्धविरामानंतर देशात एलपीजी, पीएनजी तसेच पेट्रोल-डिझेलच्या पुरवठ्याबाबत निर्माण झालेल्या चिंतेवर केंद्र सरकारनं मोठा खुलासा करत दिलासा दिला आहे. सरकारकडे इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध असून कोणत्याही प्रकारची टंचाई नसल्याचं स्पष्ट करण्यात आलं आहे.




पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या संयुक्त सचिव सुजाता शर्मायांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, देशात दररोज सुमारे १ लाख एलपीजी सिलेंडरची विक्री होत असून पुरवठा पूर्णपणे सुरळीत आहे. एलपीजी वितरक आणि पेट्रोल पंपांकडे पुरेसा साठा उपलब्ध आहे. घरगुती एलपीजी पुरवठा सामान्य असून ९८ टक्के बुकिंग ऑनलाईन पद्धतीने होत आहेत.

व्यावसायिक एलपीजी पुरवठा देखील हळूहळू पूर्वपदावर येत आहे. सध्या सुमारे ७० टक्के पुरवठा पुन्हा सुरू झाला आहे. १४ मार्चपासून आतापर्यंत सुमारे १ लाख ६ हजार टन एलपीजीची विक्री झाली असून दररोज ६ ते ६.५ हजार टन विक्री होत असल्याची माहिती देण्यात आली.

५ किलोच्या एलपीजी सिलेंडरबाबतही सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. नागरिकांना सुलभता मिळावी म्हणून ओळखपत्राशिवायही या सिलेंडरचा पुरवठा दुप्पट करण्यात आला आहे, असेही त्यांनी सांगितले.








# अमेरिकेच्या हल्ल्यात इराणचे माजी परराष्ट्र मंत्री कमाल खर्राजी यांचा मृत्यू

**तेहरान (वृत्तसंस्था)–** इराणचे माजी परराष्ट्र मंत्री कमाल खर्राजी यांचे गुरुवारी (९ एप्रिल) उशिरा रात्री मृत्यू झाला. गेल्या आठवड्यात झालेल्या अमेरिकन हवाई हल्ल्यात ते जखमी झाले होते. या वृत्ताची पुष्टी इराणच्या सरकारी दूरदर्शनने केली आहे.

प्राप्त झालेल्या अहवालानुसार, तेहरानमधील त्यांच्या निवासस्थानी हा हल्ला करण्यात आला होता. हल्ल्यानंतर त्यांना गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. इराणी माध्यमे आणि स्थानिक अहवालांमध्ये याला 'हत्या करण्याचा प्रयत्न' असे म्हटले आहे.

खर्राजी हे इराणच्या 'स्ट्रॅटेजिक फॉरेन रिलेशन्स कौन्सिल'चे अध्यक्ष होते. ही संस्था थेट देशाच्या सर्वोच्च नेत्याला सल्ला देते आणि परराष्ट्र धोरणाशी संबंधित महत्त्वाच्या निर्णयांमध्ये मोठी भूमिका बजावते. ही घटना अशा वेळी घडली आहे, जेव्हा अमेरिका आणि इस्रायलचे इराणवरील हल्ले सलग पाचव्या आठवड्यातही सुरू होते.




जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकल जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# बालकर्करोग : वाढत्या संकटाकडे दुर्लक्ष का?

जगभरातील आरोग्य व्यवस्थेसमोर उभे ठाकलेले एक गंभीर आणि हळूहळू भीषण होत चाललेले संकट म्हणजे बालकर्करोग. 'द लॅन्सेट' या नियतकालिका-मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'ग्लोबल बर्डन ऑफ डिसीज २०२३'च्या अहवालाने या समस्येचे भयावह चित्र उघड केले आहे. एकीकडे विज्ञान, औषधोपचार आणि आरोग्य सुविधांमध्ये प्रगती होत असताना, दुसरीकडे लहान मुलांमध्ये कर्करोगाचे वाढते प्रमाण हे आपल्या विकासाच्या मॉडेलवरच प्रश्नचिन्ह उभे करते. विशेषतः भारतासारख्या देशात ही परिस्थिती अधिक चिंताजनक आहे. २०२३ मध्ये भारतात सुमारे १७ हजार बालकांचा कर्करोगामुळे मृत्यू झाला, ही बाब केवळ आकडेवारी नाही, तर हजारो कुटुंबांचे उद्ध्वस्त झालेले जीवन आहे. बालक हे देशाचे भविष्य असतात, असे आपण नेहमी म्हणतो. पण त्या भविष्याचे रक्षण करण्यासाठी आवश्यक ती पावले उचलली जात नसतील, तर ही केवळ घोषवाक्ये ठरतात. त्यामुळेच बालकर्करोगाच्या या वाढत्या संकटाकडे तातडीने आणि गांभीर्याने लक्ष देणे ही काळाची गरज आहे. मुलांच्या मृत्यूच्या कारणांमध्ये कर्करोग दहाव्या क्रमांकावर पोहोचला आहे, हे चित्र भयावह आहे. याहूनही धक्कादायक म्हणजे, जगभरातील बालकर्करोगामुळे होणाऱ्या मृत्यूंपैकी तब्बल ९४ टक्के मृत्यू हे गरीब आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये होतात. म्हणजेच हा केवळ आरोग्याचा प्रश्न नसून तो आर्थिक आणि सामाजिक विषमतेचाही मुद्दा आहे. दक्षिण आशिया हा या संकटाचा मोठा केंद्रबिंदू ठरत आहे. जागतिक पातळीवरील बालकर्करोग मृत्यूंपैकी सुमारे २० टक्के मृत्यू या प्रदेशात होतात. याचा अर्थ असा की, आपल्या आरोग्य व्यवस्थेतील कमतरता, जागरूकतेचा अभाव आणि उपचारांच्या उपलब्धतेतील असमानता ही मुलांच्या जीवावर बेतत आहे. १९९० ते २०२३ या कालावधीत मृत्यूंच्या प्रमाणात १६.९ टक्क्यांनी वाढ झाली आहे, ही बाब अत्यंत चिंताजनक आहे. आरोग्य क्षेत्रात अनेक योजना आणि उपक्रम राबवूनही जर मृत्यूदर वाढत असेल, तर त्या धोरणांची पुनर्रचना करणे आवश्यक ठरते. बालकर्करोगाचे स्वरूप प्रौढांपेक्षा वेगळे असते. अनेक वेळा त्याची लक्षणे साधी वाटतात आणि त्यामुळे पालकांकडून किंवा प्राथमिक आरोग्य केंद्रांकडून त्याकडे दुर्लक्ष होते. वेळेवर निदान न झाल्यामुळे उपचार उशिरा सुरू होतात आणि तेव्हाच मृत्यूची शक्यता वाढते. भारतात अजूनही ग्रामीण भागात प्रगत तपासणी सुविधा आणि तज्ज्ञ डॉक्टरांची कमतरता आहे. यामुळे अनेक रुग्ण शेवटच्या टप्प्यावरच मोठ्या शहरांमध्ये पोहोचतात. याशिवाय, उपचारांचा खर्च हा देखील एक मोठा अडथळा आहे. कर्करोगावरील उपचार दीर्घकालीन आणि खर्चिक असतात. गरीब कुटुंबांसाठी हे उपचार परवडणे अवघड जाते. अनेक वेळा उपचार अर्धवट सोडले जातात, ज्यामुळे मृत्यूदर वाढतो. शासनाच्या विविध आरोग्य योजनांद्वारे मदत केली जात असली, तरी त्याची पोहोच आणि प्रभाव अजूनही मर्यादित आहे. या पार्श्वभूमीवर काही मूलभूत बदल करणे अत्यावश्यक आहे. सर्वप्रथम, बालकर्करोगाबाबत जनजागृती वाढवणे गरजेचे आहे. पालकांना लक्षणांची माहिती असणे, नियमित तपासणी करणे आणि वेळेवर डॉक्टरांकडे जाणे यामुळे अनेक जीव वाचू शकतात. दुसरे म्हणजे, प्राथमिक आरोग्य केंद्रांना सक्षम करणे आवश्यक आहे. तिथे प्रशिक्षित डॉक्टर आणि आवश्यक तपासणी सुविधा उपलब्ध करून दिल्यास लवकर निदान शक्य होईल. तिसरे म्हणजे, उपचारांची उपलब्धता आणि परवडणारी किंमत यावर विशेष भर दिला पाहिजे. सरकारी रुग्णालयांमध्ये अत्याधुनिक उपचार सुविधा वाढवणे, औषधांचे दर नियंत्रित करणे आणि विमा योजनांचा विस्तार करणे गरजेचे आहे. तसेच, बालकर्करोगासाठी विशेष संशोधन आणि डेटा संकलनावरही भर दिला पाहिजे. कारण अचूक माहिती आणि संशोधनावर आधारित धोरणेच प्रभावी ठरू शकतात. या समस्येकडे केवळ आरोग्याचा मुद्दा म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. हा सामाजिक न्यायाचा प्रश्न आहे. प्रत्येक मुलाला जगण्याचा आणि निरोगी राहण्याचा अधिकार आहे. आर्थिक परिस्थितीमुळे एखाद्या मुलाला उपचार न मिळणे ही कोणत्याही प्रगत समाजासाठी लाजिरवाणी बाब आहे. आज गरज आहे ती समन्वयित प्रयत्नांची. शासन, आरोग्य संस्था, स्वयंसेवी संघटना आणि समाज यांच्यातील सहकार्यानेच या संकटावर मात करता येईल. अन्यथा बालकर्करोगाचे वाढते प्रमाण हे भविष्यात आणखी मोठे आव्हान ठरेल.

# बुद्धीप्रमाण्यवादी समाजसुधारक महात्मा फुले



महात्मा फुले छत्रपती शिवराय, थॉमस पेन, जॉर्ज वॉशिंग्टन इत्यादी महान विभूतींच्या विचारांनी प्रभावित झाले होते. मनुस्मृतीच्या गुलामगिरीतून भारताला मुक्त करणारे पहिले महापुरुष म्हणजे महात्मा फुले होय. भारतातील शोषित, पीडित, दलित, कामकरी, कष्टकरी लोकांसाठी प्रस्थापितांच्या सामाजिक गुलामगिरीचे ओझे खांद्यावर असलेल्या लोकांसाठी, त्याचबरोबर स्वातंत्र्य या मूल्याची कधी स्वप्नातही चाहूल न लागलेल्या लोकांसाठी महात्मा फुले यांनी आपले जीवन व लेखणी वाप-रली. महात्मा फुले यांच्या काळात भारतीय समाजव्यवस्थाही अतिशय परंपरावादी, जीर्णशीर्ण, प्रतिगामी मूल्यांवर आधारलेली असल्याने महात्मा फुलेंनी या मूल्यांच्या मुळावरच घणाघाती आघात केला. त्याचबरोबर दलित, पीडित, शोषित, बहुजनांना स्वतंत्र माणूस म्हणून सन्मानाने जगताही येत नव्हते आणि सन्मानाने मरता ही येत नव्हते. त्यांच्यासाठी त्यांनी चातुर्वर्ण व्यवस्थेने पोखरलेली समाज व्यवस्था संपूर्णतः बदलून टाकण्याचा निश्चय केला.

भारतीय समाजाने स्त्री, शूद्र, अति शूद्र म्हणजेच बहुजनांना अनादी काळापासून मानवी हक्कापासून वंचित ठेवले होते. बहुजनांची मानसिक, सामाजिक व आर्थिक गुलामगिरीची शृंखला तोडण्यासाठी महात्मा फुलेंनी आपल्या शेवटच्या श्वासापर्यंत प्रयत्न केले. ते म्हणतात, "बहुजनांच्या सर्व सामाजिक समस्यांचे मूळ अज्ञान आहे आणि यावर तोडगा काढण्यासाठी शिक्षण हा एकमेव मार्ग आहे."

महात्मा फुले यांचा लढा हा विशिष्ट उच्चभ्रू वर्गातील लोकांसोबत नव्हता तर जीर्ण झालेल्या धर्म कल्पना, अज्ञान, रूढी यांच्याविरुद्ध होता. महात्मा फुले यांनी १८७३ मध्ये गुलामगिरी ग्रंथातून सामाजिक असमानता, शूद्र, अति शूद्र यांचे शोषण आणि मानसिक गुलामगिरीवर कडाडून टीका केली आहे. त्यांनी प्रस्थापित उच्चवर्णीय वर्चस्व स्थानाला आव्हान देत शिक्षणाद्वारे अस्पृश्यता नष्ट करून माणसाला माणूस म्हणून जगण्याचा हक्क मिळवून देण्याचे विचार मांडले. त्यांच्या मते गुलामगिरी ही शारीरिक नसून मानसिक शोषणाचे साधन आहे.

ते पुढे म्हणतात, "शारीरिक गुलामगिरीपेक्षा मानसिक गुलामगिरी जास्त भयानक असते. ज्यामुळे शूद्र अतिशूद्र स्वतःच्या शोषणाला जबाबदार ठरत हो-ते. गुलामगिरी हा ग्रंथ महात्मा फुले यांनी अमेरिकेतील कृष्णवर्णीय गुलामांना समर्पण केला. ज्यांनी गुलामगिरीच्या बेड्या झुगारण्यासाठी संघर्ष केला होता. गुलामगिरी हा ग्रंथ भारतातील जातीव्यवस्था, ब्राह्मणवादी शोषण आणि शुद्र, अतिशुद्रांच्या गुलामीवर प्रहार करतो. या ग्रंथात महात्मा फुले यांनी अमेरिकेतील कृष्णवर्णीय गुलामांची तुलना करीत भारतातील सामाजिक विषमतेचा पर्दाफाश केला व स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार केला. त्याचबरोबर भारतातील अन्यायी प्रथांवर यामध्ये टीका आहे. त्यात परकीय आर्यांनी मूळ भारतीय रहिवाशांना कसे गुलाम बनवले? याचे स्पष्ट विश्लेषण आहे.

गुलामगिरी ग्रंथ लिहिण्यामागचा महात्मा फुल्यांचा उद्देश बहुजन समाजाला उच्चवर्णीय व्यवस्थेच्या अन्यायातून मुक्त करणे व जागृत करणे हा होता. त्याचबरोबर या ग्रंथात महात्मा फुलेंनी वैदिक धर्मातील पौराणिक ग्रंथ हे विशिष्ट उच्चवर्णीय लोकांच्या शोषणाचे हत्यार झाले आहेत हे सप्रमाण सिद्ध केले आहे व अपमानास्पद जीवन बहुजनांच्या वाट्याला ब्राह्मणामुळे आले आहे त्यांच्या हुंकाराची मांडणी महात्मा फुलेंनी त्यांच्या गुलामगिरी ग्रंथात केली आहे. महात्मा फुले म्हणतात, "ज्या दिवशी मनुष्य गुलाम होतो त्या दिवशी त्याचे अधिकार हिरावून घेतले जातात. धर्म, देव, ईश्वर, मंदिर यातून ब्राह्मण आपली व्यवस्था राबवत असतो. ब्राह्मणांची अव-तार परंपरा समप्रमाण उलगडून दाखवली. ते म्हणतात, "ब्राह्मणांनी येथील बळीवंशाची संस्कृती नष्ट केली व येथील मूळ रहिवासी लोकांना गुलाम केले."

महात्मा फुले यांच्या गुलामगिरी ग्रंथात प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत उच्चवर्णीय आणि शुद्र, अति क्षुद्र यांच्यामधील संघर्षाची कथा मांडली आहे. फुले म्हणतात, "भारतात आर्य येण्यापूर्वी येथे वर्णव्यवस्था आणि जातीव्यवस्था नव्हती तर समतेवर आधारित राज्य होते. ज्यास आपण बळीचे राज्य म्हणतो. जेथे आर्थिक प्रगती होती आणि सर्व रयत शेती करत होती आणि गरज पडल्यास शत्रू सोबत लढत होते आणि त्यामुळे सर्वजण क्षत्रियकुलीन होते आणि सर्वांना क्षत्रिय म्हणून ओळखले जायचे." फुल्यांनीही या सर्वांना या ग्रंथात क्षत्रिय म्हणून संबोधले आहे. त्याचबरोबर बळीराजा आणि त्याच्या राज्याचे वर्णन करताना ते म्हणतात, "या देशाचा एक मोठा भाग बळी राजाच्या अधिपत्याखाली होता आणि बळीच्या अधिपत्याखाली दुसरा एक प्रदेश होता, ज्यास महाराष्ट्र म्हणून ओळखले जाते." या ग्रंथात फुल्यांनी मूळ रहिवाशांना महाराष्ट्रीयन म्हणून ओळखले जायचे असे स्पष्ट म्हटले आहे आणि याचा पुढे अपभ्रंश होऊन मराठे हा शब्द तयार झाला. उच्चवर्णीय यांच्या आगमनापूर्वी महाराष्ट्रात कोणतीही वर्णव्यवस्था, जाती विभाजन नव्हते. मराठ्यांची संख्या उच्चवर्णीच्या तु-लनेत दहा पटीने अधिक होती. त्यामुळे या मराठ्यांना आपले अधिकृत गुलाम बनवण्यासाठी त्यांच्या शिक्षणाचा हक्क हिरावून घेतला आणि त्यांचे हजारो जातीमध्ये विभाजन केले. जाती, वर्णव्यवस्था तयार करून या उच्चवर्णीय आर्यांनी येथील मूळ लोकांमध्ये एकमेकांविषयी द्वेष भावना तयार करण्याची योजना तयार केली आणि त्यांनी प्रेमाऐवजी येथील लोकांमध्ये द्वेषाचे बीज रोपण करुन जाती-जातीत भांडणे लावली आणि आपले वर्चस्व मजबूत केले, आणि ते येथेच स्थायिक झाले आणि येथील लोकांना गुलाम बनून मेहनत न करता मोजमजा केली आणि यासाठी जातीभेद ईश्वरनिर्मित आहे हे सिद्ध करणाऱ्या अनेक ग्रंथांची निर्मिती केली. जसे की, मनूस्मृती आणि त्यामुळे येथील लोक एकमेकांना उच्चनीच समजू लागले आणि एकता नष्ट होऊन द्वेषभावना बळा-वली आणि या समाजातील फुटीचा फायदा या उच्चवर्णीयांनी घेतला.

महात्मा फुले पुढे म्हणतात, "मंदिराचा अर्थ आहे मानसिक गुलामगिरीचा रस्ता. शाळेचा अर्थ आहे, जीवनामध्ये प्रकाशाचा रस्ता. मंदिराची जेव्हा घंटी वाजते तेव्हा ती घंटी आम्हांला हा संदेश देते की आम्ही धर्म, अंधविश्वास, पाखंडीपणा आणि मूर्खतः याकडे ओढले जात आहोत.

महात्मा फुले म्हणतात, "धार्मिक पुराण कथांमधील अवतार हे आर्यांनी म्हणजेच जे बाहेरून आलेल्या लोकांनी येथील मूळ भारतीय रहिवाशांना गुलाम बनवण्यासाठी रचलेला खोटा प्रपंच आहे आणि या सर्व कचाट्यातून बहुजनांना सोडवण्यासाठी महात्मा फुल्यांनी डिसेंबर १८७३ मध्ये धार्मिक गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. ते म्हणतात, "निसर्गाने सर्वांना समान बनवले आहे. त्यामुळे एका माणसाने दुसऱ्या माणसावर अन्याय करणे, अस्पृश्यता पाळणे ही गुलामगिरीची लक्षणे आहेत आणि ती मानवी हक्काच्या विरोधी आहेत. ते अस्पृश्यतेविषयी विचार मांडताना म्हणतात, "हे उच्चवर्णीय विष्टा खाणाऱ्या पशुंचं गोमुत्र पिऊन पवित्र होतात, परंतु ते शुद्रांच्या हस्ते स्वच्छ पाणी पिण्यास अपवित्र मानतात, ही कुठली आली मानवता?" त्यांनी समाजातील रूढी, अन्यायाला कडाडून विरोध केला आणि शिक्षणाला समाज सुधारण्याचे मुख्य साधन मानले. ते म्हणतात, "जातीव्यवस्था मोडल्याशिवाय खरे स्वातंत्र्य येणार नाही." पुढे ते म्हण-तात, "धर्म ही व्यक्तिगत श्रद्धा असू शकते, पण ती सामाजिक अन्यायाचे साधन बनता कामा नये." बहुजन समाजाची सामाजिक, मानसिक, बौद्धिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय गुलामगिरीतून मुक्तता करण्यासाठी महात्मा फुले यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्था-पना केली. धार्मिक व सामाजिक गुलामगिरी नष्ट करणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते तर 'सर्व साक्षी जगत्पती, त्याला नकोच मध्यस्ती' हे ब्रीदवाक्य होते.


स्त्री, शूद्र व अती शुद्र यांची जुल्मी साखळदंडातून सुटका, सती प्रथेला विरोध, केशवपन प्रथेला विरोध, अस्पृश्यता निव-ारण, विधवा पुनर्विवाहला प्रोत्साहन, बालहत्या प्रतिबंधात्मक गृह इत्यादी कार्य हाती घेऊन बहुजनांच्या गुलामीच्या बेड्या महात्मा फुले यांनी उखडून टाकल्या अशा या मानवतावादी, बुद्धी प्रामाण्यवादी, चिकित्सक, सामाजिक न्यायाच्या पुजाऱ्यास जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

**-डॉ. सत्यभामा जाधव**
सदस्या
बाल कल्याण समिती, नांदेड
मो. ९४०३७४४७१५

# सामाजिक क्रांतीचे दीपस्तंभ : महात्मा जोतीराव फुले

भारताच्या सामाजिक इतिहासात ११ एप्रिल हा दिवस केवळ एका महापुरुषाच्या जन्माचा दिवस नाही, तर समता, शिक्षण आणि मानवतेच्या नव्या युगाची सुरूवात करणारा दिवस आहे. महात्मा जोतीराव गोविंदराव फुले यांच्या जन्मामुळे भारतीय समाजव्यवस्थेला नवी दिशा मिळाली. सन १८२७ मध्ये जन्मलेल्या या युगपुरुषाच्या विचारांचा प्रकाश आजही समाजाच्या प्रत्येक स्तरावर जाणवतो. ११ एप्रिल पासून महात्मा ज्योतिबा फुले द्विशताब्दी जयंती वर्ष साजरे केले जाणार आहे. महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात द्विशताब्दी जयंती समिती स्थापन केली आहे.समाजातील समता, शिक्षण, स्त्री-सक्षमीकरणांचे विचार लोकांपर्यंत पोहोचविण्याचा राज्य सरकारने संकल्प केला आहे.त्यामुळे ११ एप्रिलचा दिवस भारताच्या सामाजिक समतेच्या तेजस्वी द्विशताब्दी पर्वाचा दिवस म्हणूनही देशात साजरा होत आहे. त्यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या कार्याचा पुनर्विचार करणे म्हणजे केवळ इतिहासाचे स्मरण नसून वर्तमानाला दिशा देण्याचे कार्य आहे.

महात्मा फुले यांच्या विचारविश्वाचा केंद्रबिंदू म्हणजे मानव हा सर्वात मोठा धर्म आहे ही भूमिका. त्यांनी धर्म, जात, पंथ यापलीकडे जाऊन माणुसकीचा विचार मांडला. त्यांच्या लेखनात आणि कृतीतून सतत दिसून येते की, समाजातील अन्याय आणि विषमता दूर केल्याशिवाय खरी प्रगती होऊ शकत नाही. त्यांनी मांडलेली समतेची संकल्पना ही केवळ तात्त्विक नव्हती, तर ती प्रत्यक्ष कृतीतून



साकारलेली होती.

महात्मा फुले यांनी घेतलेला सर्वात क्रांतिकारी निर्णय म्हणजे शिक्षणाचा प्रसार. त्यांनी प्रथम स्वतःच्या पत्नीला सावित्रीबाई फुले यांना शिक्षित केले आणि त्यानंतर १८४८ मध्ये पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरु केली. सावित्रीबाईंनीही समाजाच्या विरोधाला न जुमानता स्वतःला शिक्षणासाठी वाहून घेतले. शेण गोट्याचा मार सहन करत सावित्रीबाईंनी स्त्री शिक्षणाचा पाया रचला. जोतीबा आणि सावित्री या दांपत्याच्या त्या काळातील सामाजिक बंडामुळे शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली झाली.त्या काळात स्त्रीशिक्षणाला तीव्र विरोध असतानाही त्यांनी मागे हटणे स्वीकारले नाही. शिक्षण हेच शोषणाविरुद्धचे सर्वात प्रभावी शस्त्र आहे, ही त्यांची धारणा होती. या कार्यातून त्यांनी समाजातील अज्ञानाची बेडी तोडण्याचा प्रयत्न केला.

महात्मा फुले यांनी केवळ सामाजिकच नव्हे, तर आर्थिक विषमतेवरही भाष्य केले.त्यांच्या शेतकऱ्यांचा आसूड या ग्रंथात त्यांनी शेतकऱ्यांच्या दुःखाचे अत्यंत वास्तव चित्रण केले आहे. महसूल व्यवस्थेतील अन्याय, सावकारशाहीचे शोषण आणि प्रशासनातील दुर्लक्ष यावर त्यांनी कठोर टीका केली. शेतकरी हा समाजाचा कणा असूनही त्याचे जीवन दारिद्र्यात का अडकले आहे, हा प्रश्न त्यांनी समाजासमोर उभा केला.

महात्मा फुले यांनी सार्वजनिक जीवनातही सक्रिय सहभाग घेतला. पुणे महानगरपालिकेच्या कार्यातून त्यांनी नागरी प्रश्नांवर काम केले. पाणीपुरवठा, स्वच्छता आणि नागरिकांच्या मूलभूत गरजांकडे त्यांनी लक्ष दिले. त्यांनी ब्रिटिश प्रशासनाशी संवाद साधून सामाजिक प्रश्न मांडले आणि वंचित घटकांसाठी न्यायाची मागणी केली. शासन कोणतेही असो, ते न्याय्य आणि लोकहितकारी असले पाहिजे, ही त्यांची भूमिका होती. हंटर शिक्षण आयोगाकडे त्यांनी निवेदन सादर केले.सार्वत्रिक शिक्षणाचा पुरस्कार केला. सामाजिक कार्य, संघटना सुरु ठेवण्यासाठी आर्थिक स्रोत मजबूत असणे आवश्यक असते. त्यासाठी अंगी व्यावसायिक कसब बाळगणे खूप गरजेचे असते. संघटना, चळवळी, सुधारणांचा डोलारा चालविण्यासाठी पैशाची गरज असते.

महात्मा फुले यांच्या कार्याला दीडशे वर्षांहून अधिक काळ लोटला असला तरी त्यांच्या विचारांची प्रासंगिकता आजही तितकीच आहे. शिक्षणातील विषमता, सामाजिक भेदभाव आणि स्त्रीसमानतेचे प्रश्न अद्यापही पूर्णतः संपलेले नाहीत. त्यामुळे त्यांच्या विचारांचा प्रसार आणि आचरण करणे ही काळाची गरज आहे. त्यांच्या कार्याचा अभ्यास केल्यास समाजपरिवर्तनासाठी आवश्यक असलेली दृष्टी मिळते.

महात्मा ज्योतिराव फुले हे एक व्यक्तिमत्त्व नसून एक चळवळ, एक विचारधारा आणि एक प्रेरणास्त्रोत आहेत. त्यांच्या कार्यातून राजर्षि छत्रपती शाहू महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रेरणा घेतली.त्यांच्या कार्यामुळेच महाराष्ट्राला फुलेशाहूआंबेडकरांचा महाराष्ट्र ही ओळख प्राप्त झाली आहे. त्यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त त्यांच्या विचारांचे स्मरण करणे म्हणजे केवळ आदर व्यक्त करणे नव्हे, तर त्या मूल्यांना आपल्या जी-वनात रुजवण्याचा संकल्प करणे होय. महाराष्ट्र शास-नाने यासंदर्भात विशेष समिती स्थापन केली असून वर्षभर महात्मा जोतीराव फुले यांच्या जीवनकार्याला साजेशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यांच्या विचारांचा प्रसार करून सामाजिक समतेचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्याचा हा एक महत्त्वपूर्ण प्रयत्न ठरणार आहे.

**-प्रवीण टाके**
उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय,कोल्हापूर

# अंधारातून प्रकाशाकडे : लक्ष्मी अग्रवाल यांची प्रेरणादायी गाथा

एकतर्फी प्रेमाच्या आड लपलेली वासना आज समाजासाठी गंभीर संकट ठरत आहे. नकार स्वीकारण्याची मानसिकता नसल्यामुळे अनेक विकृत प्रवृत्ती जन्म घेतात. याचा सर्वाधिक फटका निरपराध मुलींना सहन करावा लागतो. छेडछाड, धमक्या, पाठलाग अशा प्रकारांपासून सुरुवात होऊन अनेकदा गंभीर गुन्ह्यांपर्यंत ही प्रवृत्ती पोहोचते. काही प्रकरणांत ॲसिड हल्ले किंवा जीवघेणे हल्ले घडल्याचेही दिसून येते. अशाच अमानवी हल्ल्याच्या झळा लक्ष्मी अग्रवाल हिला भोगाव्या लागल्या. परंतु तिच्यासारख्या मुलींनी या अत्याचारांना धैर्याने सामोरे जाऊन समाजासमोर नवा आदर्श ठेवला. तर काही प्रकरणांत मुलींना आपले आयुष्यच गमवावे लागले, ही अत्यंत वेदनादायक बाब आहे. ही समस्या केवळ वैयक्तिक नसून सामाजिक मानसिकतेचे प्रतिबिंब आहे. यावर नियंत्रण मिळवण्यासाठी कायदे, शिक्षण आणि संवेदनशीलता अत्यंत आवश्यक आहेत.

मुलींच्या सुरक्षिततेसाठी समाजाने एकत्र येऊन ठोस पावले उचलण्याची हीच वेळ आहे. मानवी आयुष्यात काही घटना अशा घडतात की त्या केवळ व्यक्तीचेच नव्हे तर संपूर्ण समाजाचे भान बदलून टाकतात. २००५ साली दिल्लीमध्ये घडलेली एक क्रूर घटना अशीच होती. त्या वेळी केवळ १५ वर्षांची असलेली लक्ष्मी अग्रवाल एका भयंकर ॲसिड हल्ल्याची बळी ठरली. एका कौटुंबिक ओळखीच्या व्यक्तीने लग्नाचा प्रस्ताव नाकारल्याच्या सूडातून तिच्यावर ॲसिड फेकण्यात आले. या घटनेने तिचे आयुष्य अक्षरशः उद्ध्वस्त केले; परंतु या राखेतूनच एक लढवय्या, समाजजागृती करणारी स्त्री जन्माला आली. हल्ल्यानंतर लक्ष्मीला असह्य वेदना, शारीरिक विद्रूपता आणि मानसिक आघाताचा सामना करावा लागला. पुढील सात वर्षांत तिने सातपेक्षा अधिक शस्त्रक्रिया केल्या.

प्रत्येक शस्त्रक्रिया म्हणजे एक नवा संघर्ष होता. मात्र, या वेदनांनी तिला खच-वले नाही, उलट तिला अधिक मजबूत बनवले. शारीरिक जखमा भरून येत असताना, तिच्या मनात एक प्रश्न सतत घोळत होता. माझ्यासारख्या इतर मुलींना हे भोगावे लागू नये, यासाठी काय करता येईल? याच विचारातून लक्ष्मीने आपला लढा सुरू केला. तिने आपल्या हल्लेखोराविरुद्ध न्यायालयीन लढा उभारला, पण तिचा






संघर्ष केवळ व्यक्तिगत नव्हता. भारतात ॲसिड सहज उपलब्ध होते आणि कोणतीही व्यक्ती ते सहज विकत घेऊ शकत होती. या धोकादायक वास्तवाविरुद्ध तिने आवाज उठवला. तिने ॲसिड विक्रीवर निर्बंध आणण्यासाठी जनहित याचिका दाखल केली. तिच्या प्रयत्नांमुळे समाजात जागरूकता निर्माण झाली आणि हजारो लोक तिच्या पाठीशी उभे राहिले.

लक्ष्मीने Stop cid Sale या मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला. या मोहिमेचा उद्देश केवळ सिड विक्रीवर नियंत्रण आणणे नव्हे, तर सिड हल्ल्यातून वाचलेल्या व्यक्तींविषयी समाजाची मानसिकता बदलणे हा होता. तिने २७,००० हून अधिक सह्या गोळा करून आपल्या मागण्यांना बळ दिले. तिच्या अथक प्रयत्नांमुळे आणि माध्यमांच्या पाठबळामुळे २०१३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने सिड विक्रीवर निर्बंध घालण्याचे आदेश दिले. तसेच पीडितांना अधिक भरपाई, शिक्षण व नोकरीत संधी यांसारख्या महत्त्वाच्या निर्णयांनाही मंजुरी मिळाली.तथापि, कायदे बनवणे आणि त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे यात अजूनही मोठी दरी आहे. अनेक ठिकाणी सिड अजूनही सहज उपलब्ध आहे आणि हल्लेखोरांना शिक्षा मिळण्याची प्रक्रिया संथ आहे. दोषींना अनेकदा फक्त १० वर्षांची शिक्षा होते, जी पीडितांच्या आयुष्यभराच्या वेदनेच्या तुलनेत अत्यंत अपुरी वाटते. या सर्व परिस्थितीतही लक्ष्मीचा लढा थांबलेला नाही.

२०१४ साली लक्ष्मीने 'छानव फाउंडेशन'ची स्थापना केली. या संस्थेमार्फत ॲसिड हल्ल्यातून वाचलेल्या महिलांना वैद्यकीय, कायदेशीर आणि मानसिक मदत दिली जाते. तसेच त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचेही काम केले जाते. समाजातील टीका आणि नकारात्मक दृष्टीकोनामुळे या महिलांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. अशा वेळी लक्ष्मीचे कार्य त्यांच्यासाठी आधारस्तंभ ठरते. याच उद्देशाने तिने 'Sheroes Hangout' हे कॅफे सुरू केले, जे पूर्णपणे सिड हल्ल्यातून वाचलेल्या महिलांकडून चालवले जाते. हे कॅफे केवळ व्यवसायाचे ठिकाण नाही, तर आत्मविश्वास, स्वाभिमान आणि नव्या आयुष्याची सुरुवात करण्याचे केंद्र आहे. येथे काम करणाऱ्या महिलांना समाजात सन्मानाने जगण्याची नवी दिशा मिळते.

लक्ष्मी अग्रवाल यांचे कार्य केवळ भार-तापुरते मर्यादित राहिले नाही. त्यांच्या धैर्य आणि संघर्षाची दखल आंतरराष्ट्रीय स्तरावरही घेतली गेली. २०१४ मध्ये त्यांना अमेरिकेच्या फर्स्ट लेडींकडून International Wom-en of Courage ward प्रदान करण्यात आला. तसेच २०१९ मध्ये त्यांना महिला सक्षमीकरणासाठी विशेष पुरस्काराने गौरविण्यात आले. या पुरस्कारांनी त्यांच्या कार्याची जागतिक पा-तळीवर नोंद घेतली.

लक्ष्मीच्या जीवनावर आधारित 'छपाक' हा चित्रपट २०१९ मध्ये प्रदर्शित झाला, ज्यामध्ये दीपिका पदुकोण यांनी तिची भूमिका साकारली. या चित्रपटामुळे समाजात सिड हल्ल्यांविषयी अधिक जागरूकता निर्माण झाली आणि लक्ष्मीच्या संघर्षाची कहाणी अधिक लोकांपर्यंत पोहचली. लक्ष्मी अग्रवाल आज केवळ एक व्यक्ती नाहीत, तर त्या धैर्य, चिकाटी आणि आशेचे प्रतीक आहेत. त्यांनी समाजाने घालून दिलेल्या सौंदर्याच्या निकषांना आव्हान दिले आणि खरे सौंदर्य आत्मविश्वासात आणि धैर्यात असते, हे सिद्ध केले. त्यांच्या संघर्षाने असंख्य महिलांना प्रेरणा दिली आहे की, कोणतीही परिस्थिती कितीही कठीण असली तरी त्यावर मात करता येते.

आज गरज आहे ती लक्ष्मीच्या लढ्याला पुढे नेण्याची. समाजाने अधिक संवेदनशील होऊन अशा पीडितांना आधार द्यावा, कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी व्हावी आणि ॲसिड हल्ल्यांसारख्या अमानवी कृत्यांना पूर्णतः आळा बसावा. लक्ष्मी अग्रवाल यांची कहाणी आपल्याला शिकवते की, अंधार कितीही गडद असला तरी एका व्यक्तीची जिद्द आणि धैर्य प्रकाश निर्माण करू शकते.

लक्ष्मी अग्रवाल यांची यशोगाथा ही केवळ एका व्यक्तीच्या संघर्षाची कथा नसून ती अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणादायी शिकवण आहे. अमानवी वेदना सहन करूनही त्यांनी हार मानली नाही, तर त्या वेदनांनाच शक्तीत रूपांतरित केले. त्यांच्या जिद्दीमुळे समाजात जागृती निर्माण झाली आणि अनेक पीडितांना नवे आयुष्य जगण्याची आशा मिळाली. आज त्या धैर्य, आत्मविश्वास आणि सक्षमीकरणाचे प्रतीक बनल्या आहेत. त्यांची कहाणी आपल्याला सांगते की, परिस्थिती कितीही कठीण असली तरी निर्धार आणि सकारात्मक दृष्टिकोन यांच्या जोरावर यशाचा मार्ग नक्कीच गाठता येतो.

**-डॉ. दीपाली चंद्रकांत पांडे**
पु. अहिल्यादेवी होळकर
महाविद्यालय, राणी सावरगाव

# ‘सावळ्या विठ्ठला’ कार्यक्रमास नांदेडकरांचा प्रतिसाद

## संगीतकार दशरथ पुजारी यांना नांदेडकरांची मनोभावे मानवंदना



**नांदेड (प्रतिनिधी)** –महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने संगीतकार दशरथ पुजारी यांच्या अजरामर रचनांचा ‘सावळ्या विठ्ठला’ या विशेष सांगितिक कार्यक्रमाचे आयोजन दि. ९ एप्रिल रोजी कुसुम सभागृह येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमास नांदेडकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या कार्यक्रमात भक्तिमय वातावरणाची अनुभूती उपस्थितांना मिळाली.

या कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे माजी शिक्षण संचालक गोविंद नांदेडे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून संगीतकार दशरथ पुजारी यांच्या प्रतिमेचे पूजन केल्यानंतर कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.

जगी ज्यास कोणी नाही, देव माझा विठू सावळा, झिम झिम झरती श्रावणधारा, क्षणभर उघड नयन देवा, अशीच आमुची आई असती, अजून त्या झुडपांच्या मागे, त्या सावळ्या तनुचे अशी व अजूनही अवीट गोडीची गाणी शेफाली कुलकर्णी, सागर जाधव आणि वर्षा जोशी यांनी गायली. संवादक म्हणून पद्माकर कुलकर्णी तर होतेच, पण संगीतकार दशरथ पुजारी यांच्या शिष्या संगीतकार आनंदी विकास यांनी त्यांच्या काही गाण्यांचे, पुजारीजी यांच्या सहवासातून अनुभवलेले काही आठवणीतील किस्से सांगून सभागृहात वेगळ्याच आनंद लहरी निर्माण केल्या.

प्रत्येक वादकाने अतिशय कसून आणि अभ्यासपूर्ण अशी साथ गायकांना दिली. वादकांच्यामध्ये विकास देशमुख, विवेक कयाळ, विश्वेश्वर जोशी, भगवानराव देशमुख, पंकज शिरभाते, श्रीनिवास, नईम शेख व इस्माईल शेख साथीला होते.

या कार्यक्रमातून अभंग, भक्तीरचना, भावगीते या सादरीकरणांद्वारे संगीतकार दशरथ पुजारी यांच्या जीवनकार्याचा व विचारांचा वेध घेण्यात आला. सावळ्या विठ्ठला या कार्यक्रमाच्या माध्यमातून अध्यात्म, भक्ती, भाव यांचा सुंदर संगम साकारण्यात आला. या प्रसंगी मान्यवरांच्या उपस्थितीत कलावंतांचा सत्कार करण्यात आला आणि सांगीतिक कार्याच्या परंपरेला महत्त्व दिले गेले. कार्यक्रमात गायक कलाकारांनी सादर केलेल्या अभंग व भजनांनी, भावगीतांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले.

या कार्यक्रमात रसिक एवढे मंत्रमुग्ध झाले की, अनेक दर्जेदार गाणी सादर करणाऱ्या गायक, गायिका यांच्या अभंगावर रसिकांनी ठेका धरत ‘विठ्ठल विठ्ठल’च्या जयघोषाने संपूर्ण सभागृह भक्तीमय झाले.

सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने आयोजित हा कार्यक्रम महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या यांच्या संकल्पनेतून तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी व संचालक यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता. नांदेड जिल्ह्याचे अप्पर जिल्हाधिकारी डॉ. रत्नदीप गायकवाड हे कार्यक्रमास पूर्णवेळ उपस्थित होते.

सुंदर सादरीकरण, प्रभावी रंगमंच व्यवस्था, सभागृह परिसरात अध्यात्मिक वातावरण निर्मिती व अचूक नियोजनाच्या या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे नांदेडमध्ये अध्यात्मिक वर्ग, संगीत व सांस्कृतिक क्षेत्रात कार्य करणारे कलावंत, तरुण वर्ग व इतर सर्वच स्तरांतून कौतुक होत आहे.

# भोकर येथील उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय रामभरोसे

## दुपारपर्यंत कार्यालयातील खुर्च्या रिकाम्या





**भोकर (प्रतिनिधी)**– येथील उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयाचा कारभार सध्या पूर्णपणे वाऱ्यावर असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. गुरुवार, दिनांक ९ एप्रिल रोजी दुपारी १ वाजेच्या सुमारास या कार्यालयात एकही अधिकारी किंवा कर्मचारी उपस्थित नसल्याने कामासाठी आलेल्या नागरिकांना रिकाम्या हाताने परतावे लागले. या प्रकारामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

शासकीय कार्यालयांची वेळ सकाळी ९:४५ ते संध्याकाळी ६:१५ पर्यंत असतानाही, भोकर येथील भूमी अभिलेख कार्यालयात गुरुवारी दुपारी १ वाजता वेगळेच चित्र पाहायला मिळाले. कार्यालयाचे दरवाजे उघडे होते, दिवे आणि पंखे सुरू होते, मात्र उपअधीक्षकांसह एकही कर्मचारी आपल्या टेबलवर हजर नव्हता. आपल्या जमिनीच्या कामासाठी लांबून आलेल्या शेतकऱ्यांना आणि नागरिकांना तासन्‌तास कर्मचाऱ्यांची प्रतीक्षा करावी लागली.

उन्हाचा कडाका वाढत असताना ग्रामीण भागातून आलेले नागरिक कामानिमित्त कार्यालयाच्या पायऱ्या झिजवत आहेत. मात्र, कार्यालयात कर्मचारीच नसल्याने दाद मागायची कोणाकडे, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. दुपारी एक वाजता जर कर्मचारी नसतील, तर सर्वसामान्य माणसाने न्याय कोणाकडे मागायचा? असा संतप्त सवाल यावेळी उपस्थित नागरिकांनी केला.

शासकीय कर्मचाऱ्यांच्या लेट लतीफमुळे आणि गैरहजेरीमुळे महत्त्वाचे दाखले, मोजणी आणि जमिनीचे उतारे मिळण्यास विलंब होत आहे. वरिष्ठ प्रशासन या गंभीर प्रकरणाची दखल घेऊन अशा बेजबाबदार कर्मचाऱ्यांवर काय कारवाई करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**महत्त्वाची कागदपत्रे उघड्यावर?**

कर्मचारी उपस्थित नसल्याने कार्यालयातील महत्त्वाचे अभिलेख आणि कागदपत्रे सुरक्षित आहेत का, असा प्रश्नही या निमित्ताने निर्माण झाला आहे. रिकाम्या खुर्च्यांचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत असून प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

## आंबेगाव सोसायटीच्या मध्यवर्ती बँकेच्या बालासाहेब मुसळे यांचा ठराव बिनविरोध मंजूर

**अर्धापूर (प्रतिनिधी)**– मध्यवर्ती बँकेच्या मतदानासाठी अर्धापूर तालुक्यातील आंबेगाव सेवा सहकारी सोसायटीचे बालासाहेब मुसळे यांच्या नावाचा ठराव बिनविरोध मंजूर करण्यात आला असल्याची माहिती भाजपाचे गोविंदराव मुसळे यांनी दिली आहे.

आंबेगाव सेवा सहकारी सोसायटीच्या सर्व संचालक मंडळाची बैठक चेअरमन आनंदराव मुसळे, व्हाईस चेअरमन उत्तमराव कल्याणकर, ज्येष्ठ संचालक बालासाहेब देशमुख, शिवानंद शिपरकर, रावसाहेब मुसळे, भाऊराव भोकरकर, पांडुरंग जोंधळे, श्रीमती कलावतीबाई भोकरकर यांच्या उपस्थितीत बालासाहेब मुसळे यांचा एकमेव अर्ज आल्याने मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीसाठी मतदानाचा अधिकार बाळासाहेब मुसळे यांना देण्यात आला.

# नांदेड जिल्ह्यात ‘सामाजिक समता सप्ताह’ उत्साहात; विविध स्पर्धा संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)**– डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहाच्या निमित्ताने नांदेड जिल्ह्यात विविध शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या अंतर्गत निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा व लघुनाट्य स्पर्धा उत्साहात पार पडल्या.

जिल्ह्यातील मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, नांदेड, अनुसूचित जाती मुलींची शासकीय निवासी शाळा, हदगाव तसेच अनुसूचित जाती मुलांची शासकीय निवासी शाळा, नायगाव येथे या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

या स्पर्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित असून, संत गाडगे महाराज यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आल्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाज कल्याण निरीक्षक पी. जी. खानसोळे हे होते, तर सहायक ग्रंथपाल नरेंद्र मस्के हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच नांदेड जिल्ह्यातील समतादूत कार्यक्रमातील प्रतिनिधीही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या स्पर्धांमध्ये निवासी शाळा व वसतिगृहातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विविध स्पर्धांमधून विद्यार्थ्यांनी आपले विचार प्रभावीपणे मांडत सामाजिक समतेचा संदेश दिला. हा कार्यक्रम सहायक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडला.

# ऑपरेशन ‘यात्री सुरक्षा’ अंतर्गत आरपीएफ व जीआरपीची संयुक्त कारवाई

## चोरीस गेलेले लाखो रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)**– रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी राबविण्यात येत असलेल्या ‘ऑपरेशन यात्री सुरक्षा’ अंतर्गत आरपीएफ नांदेड व लोहमार्ग पोलीस/नांदेड यांच्या संयुक्त पथकाने महत्त्वपूर्ण कारवाई करत उच्च मूल्याच्या चेन स्नॅचिंगसह चार प्रकरणांतील चोरीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दिनांक १ एप्रिल २०२६ रोजी संयुक्त पथकाने प्रवाशांच्या मालमत्तेची चोरी करणाऱ्या दोन सराईत आरोपींना अटक केली. तपासादरम्यान त्यांचा संबंध लोहमार्ग पोलीस नांदेड येथे नोंद असलेल्या गुन्हा, दिनांक २६ फेब्रुवारी २०२६ या उच्च मूल्याच्या चेन स्नॅचिंग प्रकरणाशी असल्याचे उघड झाले.

यानंतर ५ एप्रिल २०२६ रोजी पोलीस कोठडी दरम्यान





मुख्य आरोपी श्रीकांत, नांदेड याच्याकडून ४ लाख ८३ हजार किमतीचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले.

सखोल चौकशीदरम्यान आरोपीने आणखी तीन चोरी व चेन स्नॅचिंग प्रकरणांमध्ये सहभाग असल्याची कबुली दिली. त्यानुसार खालील गुन्ह्यांमध्ये चोरीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

गुन्हा क्र. ४२५ (दिनांक ७ आगस्ट २०२५) २० ग्रॅम चांदीचे दागिने (अंदाजे किंमत १० हजार), गुन्हा क्र. २७६ (दिनांक २१.०५.२०२५) २६.५ ग्रॅम सोन्याचे दागिने (अंदाजे किंमत, १ हजार ४० हजार), गुन्हा क्र. २७ (दिनांक २८ जानेवारी २०२६) १० ग्रॅम सोन्याचे दागिने (अंदाजे किंमत २० हजार) अशा प्रकारे आरपीएफ नांदेड व लोहमार्ग पोलीस/नांदेडच्या संयुक्त कारवाईतून विविध प्रकरणांतील लाखो रुपयांचा चोरीचा मुद्देमाल जप्त करण्यात यश मिळाले आहे. दिनांक ८ एप्रिल रोजी आरोपीस पोलीस कोठडीनंतर माननीय जेएमएफसी न्यायालय, नांदेड येथे हजर करण्यात आले.

रेल्वे प्रशासनाने ‘ऑपरेशन यात्री सुरक्षा’ अंतर्गत प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी अशा प्रकारच्या कारवाया पुढेही सुरू राहतील, असे सांगितले आहे.

# लोहा पोलीस स्टेशनमध्ये भीम जयंतीनिमित्त शांतता समितीची बैठक



**लोहा (प्रतिनिधी)** –भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त लोहा पोलीस स्टेशनमध्ये शांतता समितीची बैठक दि. ६ एप्रिल २०२६ रोजी पार पडली.

यावेळी सदरील बैठकीच्या अध्यक्षस्थानी डीवायएसपी अश्विनी जगताप होत्या. याप्रसंगी लोहा न. प. चे नगराध्यक्ष शरद पाटील पवार, उपनगराध्यक्ष करीम शेख मुजावर, गटनेते भास्करराव पाटील पवार, बबनराव निर्मले, बालाजी खिल्लारे, गंगाधर महाबळे, नगरसेवक प्र.केतन खिल्लारे, बी. डी. जाधव, पीआय नागनाथ आयलाने, डी. बी.चे सदाशिव जामकर, नायब तहसीलदार राजेश पाठक, लोहा न.प.चे मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे, महावितरणचे वडजे, सा.बां.चे अभियंता, भारतीय बौद्ध महासभेचे केंद्रीय शिक्षक धोंडीबा यानभुरे, अनिल धुतमल, रत्नाकर महाबळे, पत्रकार विलास सावळे, विनोद महाबळे, गजानन दांगटे, लखन महाबळे, यशपाल निर्मले, अनिल गायकवाड यांच्यासह सार्वजनिक भीमजयंती मंडाळाचे सर्व पदाधिकारी, लोहा पोलीस स्टेशनचे कर्मचारी, पोलीस पाटील यांच्यासह मोठ्या संख्येने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना डीवायएसपी अश्विनी जगताप म्हणाल्या की, लोहावासीयांनी प्रशासनाला नेहमीच साथ दिली आहे. महापुरुषांचे विचार डोक्यात गेले पाहिजे, श्री डी मुक्त जयंती साजरी केल्यास खऱ्या अर्थाने महापुरुषांच्या विचारांचे आचरण केल्याचे सिद्ध होईल.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणुकीस रात्री १२ वाजेपर्यंत परवानगी द्या –बंटी लांडगे

**नांदेड (प्रतिनिधी)**– भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती दरवर्षी देशासह जगभरात मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. नांदेड शहरातही विविध भागांमधून आकर्षक देखावे, सांस्कृतिक कार्यक्रम व डीजेसह भव्य मिरवणुका आयोजित केल्या जातात. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने सहकार्याची भूमिका घेत जयंती मंडळांना डीजेसह मिरवणुकीस रात्री १२ वाजेपर्यंत परवानगी द्यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते बंटी लांडगे यांनी केली आहे.



आंबेडकर जयंती हा सामाजिक एकात्मता, प्रेरणा व अभिमानाचा उत्सव असल्याने प्रशासनाने सकारात्मक निर्णय घेऊन उत्सव शांततेत व उत्साहात पार पडण्यासाठी सहकार्य करावे, असे त्यांनी नमूद केले. तसेच मिरवणुकीदरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी सर्व भीमसैनिक एकजुटीने प्रशासनास पूर्ण सहकार्य करतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, जयंती उत्सव शांततेत पार पडावा यासाठी आयोजक मंडळांनी प्रशासनाच्या नियमांचे पालन करण्याचे आवाहनही लांडगे यांनी केले.

# लहानग्याचे मोठेपण : पाचवीतील विद्यार्थ्याने प्रसंगावधान दाखवत बालकाचे प्राण वाचवले

**नायगाव बाजार (प्रतिनिधी)** –धैर्य, तत्परता आणि मानवतेची जाणीव वयावर अवलंबून नसते, याचे जिवंत उदाहरण नायगाव तालुक्यातील रातोळी येथील एका शालेय विद्यार्थ्याने घालून दिले आहे. ईगल इंग्लिश स्कूल, रातोळी येथील इयत्ता पाचवीत शिकणाऱ्या अभिराज संदीप पाटील या विद्यार्थ्याने प्रसंगावधान राखत तीन वर्षांच्या बालकाचे प्राण वाचवून उल्लेखनीय शौर्य दाखवले आहे. त्याच्या या कृतीचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.





मिळालेल्या माहितीनुसार, दुपारच्या सुमारास अभिराज घराबाहेर असताना रस्त्यालगत असलेल्या पाण्याच्या भरलेल्या टाकीत काहीतरी पडल्याचा आवाज त्याच्या कानावर आला. आजूबाजूला कोणीही नसल्याचे लक्षात येताच त्याने वेळ न दवडता त्या दिशेने धाव घेतली. टाकीत डोकावून पाहिले असता एक लहान बालक पाण्यात गुदमरू लागल्याचे त्याच्या लक्षात आले. क्षणभरही न थांबता आणि स्वतः च्या जीवाची पर्वा न करता अभिराजने तत्काळ टाकीत उडी घेतली व त्या बालकाला बाहेर काढले.

त्याच्या या धाडसी कृतीमुळे संभाव्य अनर्थ टळला आणि एका निष्पाप जीवाला नवजीवन मिळाले. एवढ्या लहान वयात दाखवलेले धैर्य आणि प्रसंगावधान समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे. संकटसमयी शांत राहून योग्य निर्णय घेण्याची क्षमता अभिराजने सिद्ध केली आहे.

# शिक्षण सेवकांना सानुग्रह अनुदानाबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठविणार

## राज्याचे शिक्षण संचालक शरद गोसावी यांची पुरोगामी शिक्षक संघटनेस ग्वाही





**नांदेड (प्रतिनिधी)**– राज्यातील शिक्षण सेवकांचा दुर्दैवाने मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान मंजूर होणे बाबतचा प्रस्ताव शासनाकडे लकरच पाठविण्यात येईल, अशी माहिती राज्याचे प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी नुकतीच महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक संघटनेच्या शिष्टमंडळास दिली.

संघटनेचे राज्याध्यक्ष प्रसाद पाटील यांच्या नेतृत्वाखाली भेटलेल्या शिष्टमंडळाने या पाच-सहा वर्षात अनेक शिक्षणसेवक मयत झाले आहेत. ते त्यांच्या कुटुंबातील जबाबदार व्यक्ती असल्याने त्यांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबियांवर मोठे आर्थिक व मानसिक संकट ओढवले जाते. शिक्षणसेवक योजनेअंतर्गत सध्या अशा प्रकरणांमध्ये सानुग्रह अनुदानाची कोणतीही तरतूद नसल्याने संबंधित कुटुंबे अडचणीत येतात. त्यामुळे अशा प्रकरणांसाठी २० लाख रुपये सानुग्रह अनुदान व इतर सहाय्य योजना तातडीने लागू करण्यात यावी अशी मागणी शिक्षण संचालक यांचेकडे केली असता संचालकांनी वरील ग्वाही दिली.

यावेळी प्राथमिक शिक्षकांना बीएलओसह इतर सर्व अशैक्षणिक कामातून मुक्त करून फक्त विद्यार्थ्यांना शिकवू द्यावे, १०० टक्के विषय शिक्षकांना पदवीधर वेतन श्रेणी लागू करावी, विनाअट निवड श्रेणी प्रस्ताव मंजूर व्हावेत, मेडिकल बील कॅशलेस पद्धत सुरु करावी, दिव्यांग, वय वर्षे ५० पूर्ण व आरोग्याची समस्या असलेल्या शिक्षकांना जनगणना कामातून वागळावे, जनगणना पूर्ण होताच कार्यमुक्ती या अटीवर जिल्हांतर्गत व आंतरजिल्हा बदली प्रक्रिया सुरु करावी आणि बदली नंतर सर्व रिक्त पदे तत्काळ भरावीत, पदोन्नतीने भरावयाची व रिक्त असलेली विस्तार अधिकारी श्रेणी २ व श्रेणी ३, केंद्र प्रमुख, मुख्याध्यापक व विषय पदे ३१ मे पूर्वी पदोन्नतीने भरण्याचे निर्देश सर्व जिल्हा प्रशासनास व्हावेत, सेवानिवृत्त शिक्षकांचे सर्व देयक बील ३ महिन्याच्या आत मिळावे, संच मान्यता करताना आधार मीस मॅच विद्यार्थी ही गृहीत धारावेत, केंद्र प्रमुख पद भरती जाहिरात मध्ये अर्ज केलेल्या शिक्षकांना माहिती दुरुस्ती करण्याची एक संधी देण्यात यावी, सन २०२५-२६ च्या संचमान्यते नुसारच समायोजन करण्यात यावे, जिल्हा परिषद शाळांचे लाईट बिल ग्रामपंचायत मार्फत भरण्यात यावे आदी मागण्या करण्यात आल्या आहेत.

# पारडीची आदर्श शाळा गावाच्या भवितव्याची गंगोत्री -डॉ. गोविंद नांदेडे

**नांदेड (प्रतिनिधी)** –लोहा तालुक्यातील पारडी गावातील प्राथमिक शाळा हीच या गावाच्या भवितव्याची गंगोत्री असून, ती बालकांच्या उज्ज्वल भवितव्याला सुरेख आकार देत आहे. गावातील उद्यमी आणि संस्कारी पिढ्या घडविण्यासाठी येथील शिक्षकांचे मौलिक योगदान असल्याचे प्रतिपादन राज्याचे पूर्व शिक्षण संचालक डॉ गोविंद नांदेडे यांनी केले आहे.

पारडी शाळेतील खो - खो खेळात राज्यस्तरावर विजयी झालेल्या विद्यार्थ्यांच्या सन्मान कार्यक्रमात अध्यक्षपदावरून ते बोलत होते.

कार्यक्रमारंभी विद्यार्थ्यांच्या लेझीम पथकाने सुंदर सादरीकरण करून विद्यार्थ्यांच्या मानवी कमानीतून पाहुण्यांचे आगळेवेगळे स्वागत केले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून आणि प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाचा आरंभ करण्यात आला. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पारडी या शाळेने ‘मुख्यमंत्री माझी शाळा आदर्श शाळा’ कार्यक्रमात प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. त्यातून प्राप्त निधीतून अत्याधुनिक डिजिटल फलक शाळेने प्राप्त केले आहेत. त्या अत्याधुनिक फलकांचे या प्रसंगी उद्घाटन करून लोकार्पण करण्यात आले.



महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे सचिव चंद्रजीत जाधव आणि राज्याचे पूर्व शिक्षण संचालक डॉ. नांदेडे यांचा लोहा तालुक्याच्या परंपरेनुसार खारीक आणि खोबऱ्याचा हार अर्पण करून सन्मान करण्यात आला. प्रारंभी कब्बडी खेळात राज्यस्तरीय नैपुण्य प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा शाल, पुष्पहार आणि पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला .

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक माधवराव किसवे यांनी केले. आपल्या प्रास्ताविकातून मुख्याध्यापकांनी आपल्या शाळेच्या यशात आपले सर्व सहकारी शिक्षक, शालेय व्यवस्थापन समिती, ग्राम पंचायत आणि गावकरी पालक आणि विद्यार्थ्यांचा सिंहाचा वाटा असल्याचे प्रतिपादन केले.

या प्रसंगी प्रमुख पाहुणे चंद्रजीत जाधव यांनी आपल्या भाषणातून खेळाचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले आणि पारडी गावाच्या यशवंत विद्यार्थ्यांना दत्तक घेऊन राष्ट्रीय स्पर्धेपर्यंत घेऊन जाण्याची हमी दिली. खेळाचा सतत सराव करत राहण्याचा सल्लाही चंद्रजीत जाधव यांनी दिला. या प्रसंगी जिल्हा खो खो संघटनेचे सचिव डॉ. रमेश नांदेडकर यांनी पारडी येथील शाळेने केलेल्या प्रगतीचे वर्णन करून मुख्याध्यापकाच्या कार्याचा गौरव केला.

या कार्यक्रमास अवघा गाव आणि पालकवर्ग मोठ्या उत्साहाने उपस्थित होता. राष्ट्र निर्माणाच्या या कार्यक्रमास धाराशिव जिल्ह्यातील तेरणा हायस्कूलचे मुख्याध्यापक निशिकांत देशमुख, राष्ट्रीय कब्बडी खेळाडू रितेश जाधव, सातारा खो खो संघटनेचे सचिव महेंद्रकुमार गाढवे, तालुका क्रीडा अधिकारी बालाजी शिर्षीकर, रमेश नांदेडकर, शिक्षण विस्तार अधिकारी विठ्ठल आचने, बी. वाय. चव्हाण, बाबुराव फसमले, गोविंदराव डीकळे, विठ्ठलराव डीकळे, बळीराम पवार, संभाजी पवार, दत्ता पवार, लक्ष्मण डिकळे, मंगनाळे, ज्योती कदम, मीनाक्षी देशमुख, वाडीकर, सुरेखाताई आणि पारडीचे सर्व पालक, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन देविदास बालाघाटे यांनी केले तर आभार फारूख शेख यांनी मानले.

# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

## इंडक्शनवर कुकिंग अन् हातात फोन?



**तुम्हीसुद्धा एका हातात फोन धरून दुसऱ्या हाताने इंडक्शनवर स्वयंपाक करता का? किंवा तुम्ही इंडक्शन वापरताना फोन, टॅब्लेट इत्यादी गॅझेट्स जवळ ठेवता का? इंडक्शनवर स्वयंपाक करताना वेब सिरीज किंवा रेसिपी पाहण्यासाठी फोन वापरण्याची सवय बऱ्याच लोकांना असते. हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की या सवयीमुळे केवळ महागड्या गॅझेट्सचे नुकसानच होत नाही, तर मोठा अपघातही होऊ शकतो. इंडक्शन हा इलेक्ट्रोमॅग्नेटिक फील्डच्या (विद्युत चुंबकीय क्षेत्राच्या) तत्त्वावर काम करतो. त्यामुळे, जर इलेक्ट्रॉनिक उपकरणे इंडक्शनच्या संपर्कात आली, तर ते सायलेंट किलर सिद्ध होऊ शकतात.**

» तुमचा स्मार्टफोन किंवा टॅब्लेट दूर ठेवा : स्मार्टफोन आणि टॅब्लेट ही सामान्य गॅझेट्स आहेत जी इंडक्शन स्टोव्हच्या सहज जवळ येऊ शकतात. हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की स्मार्टफोन आणि टॅब्लेटमध्ये अत्यंत नाजूक सेन्सर्स आणि मायक्रोचिप्स असतात. इंडक्शन स्टोव्हच्या इलेक्ट्रोमॅग्नेटिक फील्डमुळे फोनमधील सर्किट्स आणि घटकांमध्ये समस्या निर्माण होऊ शकतात, इतकेच नव्हे तर फोनचा मदरबोर्ड देखील निकामी होऊ शकतो.

» तुमच्या स्मार्टवॉचचे इंडक्शन स्टोव्हपासून संरक्षण करा : तुमच्या फोन किंवा टॅब्लेटनंतर, इंडक्शन स्टोव्हच्या जवळ येऊ शकणारी पुढची वस्तू म्हणजे तुमचे स्मार्टवॉच. इंडक्शन स्टोव्हच्या इलेक्ट्रोमॅग्नेटिक फील्डमुळे स्मार्टवॉचचे नाजूक सेन्सर्स आणि बॅटरी खराब होऊ शकते किंवा ते व्यवस्थित काम करणे थांबवू शकते. त्यामुळे, इंडक्शन स्टोव्ह वापरताना तुमचे स्मार्टवॉच हातातून काढून ठेवणे उत्तम.

» पॉवर बँक इंडक्शनजवळ नेऊ नका... : जसे तुम्ही चुकून किंवा नकळतपणे तुमचा फोन किंवा टॅब्लेट इंडक्शन स्टोव्हजवळ नेऊ शकता, त्याचप्रमाणे तुम्ही ती गॅझेट्स वापरताना तुमचा पॉवर बँक देखील इंडक्शन स्टोव्हजवळ नेऊ शकता. इंडक्शन स्टोव्हच्या इलेक्ट्रोमॅग्नेटिक फील्डमुळे पॉवर बँकच्या सर्किटरीमध्ये समस्या निर्माण होऊ शकतात. तुम्ही वायरलेस चार्जिंग पॉवर बँक वापरल्यास हा धोका आणखी वाढतो.

» क्रेडिट किंवा डेबिट कार्ड होऊ शकते खराब : क्रेडिट किंवा डेबिट कार्ड गॅझेट नसले तरी, इंडक्शन स्टोव्हच्या इलेक्ट्रोमॅग्नेटिक फील्डमुळे त्यावरील मॅग्नेटिक स्ट्रिप खराब होऊ शकते. परिणामी, मशीनमध्ये स्वाइप केल्यावर तुमचे कार्ड काम करणार नाही अशी शक्यता आहे. म्हणून, ही कार्डे इंडक्शन स्टोव्हपासून दूर ठेवणे उत्तम.

» इअरबड्स खराब होऊ शकतात... : आजकाल लोक वायरलेस इअरबड्सचा अधिक वापर करतात. अशा परिस्थितीत, तुम्ही नकळतपणे कानात असलेले वायरलेस इअरबड्स इंडक्शनजवळ आणू शकता. खरे तर, इंडक्शनमुळे निर्माण होणारे इलेक्ट्रोमॅग्नेटिक फील्ड या उपकरणांमधील नाजूक अंतर्गत सर्किट्स आणि सेन्सर्समध्ये व्यत्यय आणू शकते, ज्यामुळे ते कायमचे खराब होऊ शकतात. अहवालानुसार, सर्वात मोठा धोका त्यांच्या लिथियम-आयन बॅटरींना असतो, ज्या विद्युत चुंबकीय क्षेत्रामुळे जास्त गरम होऊ शकतात किंवा फुगू शकतात.

# बँक खात्याशिवाय करता येईल UPI पेमेंट!

## GPAY ने आणले पॉकेट मनी फीचर, कसे सेट करायचे जाणून घ्या...

**गुगल पे ने एक असे फीचर सादर केले आहे, ज्यामुळे तुम्ही बँक खात्याशिवाय पेमेंट करू शकता. गुगल पेच्या UPI सर्कलमध्ये पॉकेट मनी हे फीचर जोडण्यात आले आहे. हे फीचर वापरकर्त्यांना त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना आणि मित्रांना त्यांच्या बँक खात्यातून UPI पेमेंट करण्याची परवानगी देते. गुगल पे वर विद्यमान UPI वापरकर्ता म्हणून, तुम्ही प्राथमिक वापरकर्ता आहात आणि तुमच्या कुटुंबातील सदस्यांना, मित्रांना किंवा कर्मचाऱ्यांना तुमच्या UPI सर्कलमध्ये जोडू शकता. ते तुमच्या UPI सर्कलचे दुय्यम वापरकर्ते बनतात. दुय्यम वापरकर्ते म्हणून, ते तुमच्या बँक खात्याचा वापर करून पेमेंट करू शकतात. मात्र त्यांच्या खर्चावर तुमचे पूर्ण नियंत्रण असते.**




### GPay मध्ये पॉकेट मनी वैशिष्ट्य कसे सेट करावे?

सर्वप्रथम, तुमच्या फोनमधील Google Pay ॲप उघडा. त्यानंतर UPI Circle वर जा किंवा ॲप उघडताच तुम्हाला हे फीचर दिसेल. दुय्यम वापरकर्त्याचे नाव किंवा फोन नंबर शोधा आणि तो निवडा. निवडलेल्या संपर्कासाठी UPI Circle QR कोड स्कॅन करा आणि मंजुरी सेटिंग्ज सेट करा. तुम्ही प्रत्येक पेमेंट मंजूर करा (Approve every payment) किंवा मासिक मर्यादा सेट करा (Set a monthly limit) यापैकी एक निवडू शकता. तुम्हाला दुय्यम वापरकर्त्यासाठी अतिरिक्त माहिती प्रविष्ट करावी लागेल, जसे की तुमचे त्यांच्याशी असलेले नाते आणि त्यांचा सरकारी ओळखपत्र क्रमांक. त्यांचे बँक खाते निवडा आणि नंतर आमंत्रित करा (Invite) वर क्लिक करा. आमंत्रण पाठवण्यासाठी, तुम्हाला तुमचा UPI PIN प्रविष्ट करावा लागेल. अशा प्रकारे तुम्ही हे फीचर वापरू शकता.

प्राथमिक वापरकर्ता म्हणून तुम्ही व्यवहाराची मर्यादा सेट करू शकता आणि कधीही पेमेंट मंजूर करू शकता. सोप्या भाषेत सांगायचे तर, ज्यांच्याकडे बँक खाते नाही आणि ज्यांना UPI पेमेंट करण्याची आवश्यकता आहे त्यांच्यासाठी हे फीचर खूप उपयुक्त आहे. उदाहरणार्थ, पालक त्यांच्या मुलांना UPI सर्कलमध्ये दुय्यम वापरकर्ते म्हणून जोडू शकतात आणि त्यांच्यासाठी पॉकेट मनी म्हणून एक रक्कम सेट करू शकतात. आता, मुले त्यांच्या पालकांनी ठरवलेल्या संख्येनुसार त्यांच्या बँक खात्यातून पेमेंट करू शकतील. प्राथमिक वापरकर्ता दोन प्रकारे व्यवहारांवर नियंत्रण ठेवू शकतो. व्यवहार मर्यादा निश्चित करून आणि पेमेंटला अधिकृत करून. जर तुम्ही दुय्यम

### पॉकेट मनी फीचर काय आहे?

वापरकर्त्याला पूर्ण अधिकार दिले, तर खात्याची मर्यादा आपोआप दरमहा १५ हजार रुपयांवर सेट केली जाईल. दुय्यम वापरकर्ते सेट करण्यासाठी तुम्हाला या गोष्टींची आवश्यकता आहे. प्राथमिक वापरकर्ता बनण्यासाठी, तुमच्याकडे UPI खाते असणे आवश्यक आहे. तुम्ही जास्तीत जास्त ५ दुय्यम वापरकर्ते जोडू शकता. तुमच्या UPI सर्कलमध्ये दुय्यम वापरकर्ता जोडण्यासाठी, त्यांचा नंबर तुमच्या फोनच्या संपर्क सूचीमध्ये सेव्ह केलेला असणे आवश्यक आहे. त्यांच्याकडे Google Pay ॲप असणे आणि त्यात त्यांचा फोन नंबर नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. त्यांच्याकडे UPI आयडी किंवा UPI सर्कल QR असणे आवश्यक आहे.

# मृत्यूनंतर आधार कार्डला नका सोडू बेवारस!

## सरकारने सांगितले, निष्क्रिय केल्यास काय होईल... प्रक्रिया समजून घ्या...

आधार कार्ड जारी करणारी सरकारी संस्था UIDAI ने भारतीयांसाठी महत्त्वाची माहिती दिली आहे. अनेकदा, जेव्हा एखाद्या वृद्ध व्यक्तीचा मृत्यू होतो, तेव्हा लोक त्यांची महत्त्वाची कागदपत्रे निष्क्रिय करायला विसरतात आणि ते अडचणीत येऊ शकतात. विशेषतः आधार कार्डच्या बाबतीत. आज भारतीयांसाठी आधार कार्ड हे एक अत्यंत महत्त्वाचे दस्तऐवज आहे. जर ते चुकीच्या लोकांच्या हातात पडले, तर त्यांना लाखो रुपयांचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे, या समस्येबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी UIDAI ने X वर पोस्ट केली आहे. तसेच, लोकांना कळवले आहे की ते 'माय आधार' पोर्टलला भेट देऊन ते आधार कार्ड निष्क्रिय करण्यासाठी अर्ज करू शकतात...

### प्रक्रिया पूर्णपणे डिजिटल

सर्वात चांगली गोष्ट म्हणजे ही प्रक्रिया पूर्णपणे डिजिटल आहे. कोणत्याही कागदपत्रांची आवश्यकता नाही. आधार निष्क्रिय केल्याने गैरवापर टाळण्यास मदत होईल. कुटुंबातील मृत सदस्याचा आधार निष्क्रिय करण्यासाठी, तुम्हाला myAadhaar पोर्टलला (myaadhaar.uidai.gov.in) भेट द्यावी लागेल. त्यानंतर, तुमच्या आधार क्रमांकाने लॉग इन करा. त्यानंतर तुम्हाला अनेक पर्याय दिसतील. 'कुटुंबातील सदस्याच्या मृत्यूची तक्रार करा' (Report Death of a Family Member) यावर क्लिक करा. तुमच्यासमोर एक विंडो उघडेल. तुम्हाला अनेक तपशील भरावे लागतील. येथे, तुम्हाला ज्या राज्यातून मृत्यू प्रमाणपत्र जारी केले होते, ते राज्यदेखील नमूद करावे लागेल. तुम्हाला इतर तपशील देखील भरावे लागतील. त्यानंतर सबमिट बटणावर क्लिक करा. अशा प्रकारे तुम्ही आधार निष्क्रिय केल्याची तक्रार करू शकता.

# अजब-गजब

## उशीफाड कुस्ती..!

न्यूयॉर्क : बदलत्या काळात लोक इंटरनेट आणि टीव्हीच्या अधिन गेले आहेत. त्यामुळे सार्वजनिक ठिकाणी एकत्र यावे, मजा लुटावी असे त्यांना वाटतही नाही. त्यांना पब्लिक प्लेसकडे आकर्षित करण्यासाठी बर्लिन आणि लंडनमध्ये २ एप्रिलला अनोख्या खेळाचे आयोजन केले होते. उशीने कुस्ती खेळण्याच्या या खेळात हजारो लोकांनी भाग घेतला आणि उशीफाड कुस्ती खेळली. उशांनी एकमेकांशी ढिश्यूमऽऽ ढिश्यूमऽऽ खेळताना त्यांच्या आनंदाला पारावर राहिला नव्हता. सरतेशेवटी फाटलेल्या उशा आणि



त्यातील त्यातील कापूस अस्ताव्यस्त पसरलेला, असे चित्र मैदानावर दिसून आले. अर्बन प्ले ग्राऊंड मूव्हमेंट या संस्थेच्या वतीने एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पिलो फाईट डे साजरा केला जातो. संस्थेने आधी फेसबुकवर या खेळाबद्दल मोहीम चालवली. सुरुवातीला शेकडो आणि नंतरच्या काळात हजारो लोकांनी त्यांच्या मोहिमेला प्रतिसाद दिला व सहभागी होणार असल्याचे कळवले. आता दरवर्षी या दिवसाची लोक जणू वाटच पाहत असतात. यंदा २ एप्रिलला बर्लिन आणि लंडनच्या पब्लिक पार्कमध्ये खेळ आयोजित केला होता. हजारो लोकांनी आपआपल्या घरून उशा आणल्या होत्या. खेळ सुरू होताच या लोकांनी आपसात उशांनी मारामारी सुरू केली. तब्बल अर्धा तास खेळ रंगला. एकमेकांना मारून मारून थकलेली मंडळी घामाने डबडबून गेली होती. उशांचा खच मैदानावर पडला होता, कापूस इतरत्र पसरल्याने हिरवे मैदान पांढरे पडले होते.

## ओळखीचा असूनही अनोळखी!

बीजिंग : चेहरा ही व्यक्तीची ओळख असते. चांगला, वाईट, गोरा, काळा कसा का असेना, पण प्रत्येकासाठी चेहरा ही स्वतःची वेगळी ओळख आहे. पण कदाचित चेहराच नसेल. म्हणजे विना चेहऱ्याचा माणूस ओळखायचा कसा, अशी कल्पना करा. चेहरा नसलेला माणूस, असं फार फार तर त्याला म्हणता येईल. वँग जियापेंग या चिमुरड्याच्या नशिबी वयाच्या अवघ्या सहाव्या वर्षीच अशी परिस्थिती उद्भवली आहे. बिच्चाऱ्याला अपघाताने चेहरा गमवावा लागला आहे. आता त्याला स्वतःचा चेहराच नाही. त्यामुळे ओळखीचा असूनही कायम सर्वांसाठी अनोळखी ठरला आहे. खेळण्या-बागडण्याच्या वयात वँग आयुष्यात बिकट परिस्थितीला तोंड देत आहे. त्यामुळे सर्वांना त्याची सहानुभूती वाटणे साहाजिकच आहे. चीनच्या निंगजिया प्रांतातील यिनचुआन गावात राहणारा वँग नोव्हेंबर २०२४ मध्ये आपला चेहरा हरवून बसला. झाले असे की, तो गॅस लाईटरशी खेळत होता. तितक्यात गॅस लाईटरने पेट घेतला आणि आगीने वँगचा चेहरा होरपळला. चेहराच नाही तर वँगने हात आणि पायांची बोटेही गमावली. या घटनेनंतर त्याच्या आई- वडिलांनी त्याला तातडीने जिंगजिया येथील सरकारी दवाखान्यात दाखल केले. आर्थिक परिस्थिती ठिक नसल्याने केवळ तीनच महिने उपचार करण्यापर्यंतचा खर्च त्याचे आई- वडिल करू शकले. वँग वडिलांनी उपचारासाठी या दरम्यान स्वतःचे राहते घरही विकले होते. पण त्यानंतर मात्र पैशाअभावी वँगला हॉस्पिटलमधून बाहेर काढावे लागले. वँगचे वडिल यूगियू (वय ३२) दुग्धव्यवसाय करतात. ते महिन्याकाठी दोन हजार युआन कमावतात. त्याची आई जेंग्वे जियू (वय ३०) गृहिणी आहे. चेहरा खराब असल्यामुळे वँग जास्तीत जास्त काळ घर आणि आवारातच काढतो. गेल्या वर्षी त्याच्या वडिलांनी त्याला शाळेत दाखल केले होते. पण शाळेच्या प्रशासनाने त्याच्याकडे पाहून मुले घाबरतात म्हणून घरी परत पाठवले. वँगचा चेहरा सामान्य करण्यासाठी तीन प्रकारच्या शस्त्रक्रिया कराव्या लागणार आहेत. याकरिता किमान ३० हजार पाऊंड लागणार आहेत. बिकट आर्थिक परिस्थितीमुळे वँगच्या आई- वडिलांकडे इतका पैसा नाही. त्यामुळे वँगला कायम विनाचेहऱ्याचा म्हणूनच जगावे लागणार आहे.





## तिची गोष्टच निराळी... कॉलेजात शिकणारी पोर झाली शिकारी!

**फ्लोरिडा :** कॉलेजची विद्यार्थिनी म्हटलं की तिला आवडतं शॉपिंग करणं, मित्रांसोबत पिक्चरला जाणं, चॅटिंग करणं आणि वेगवेगळ्या फॅशन करून सर्वांना आकर्षित करणं... पण फ्लोरिडाच्या रेगिस गिलेसची गोष्टच निराळी. तिचे विचार यापेक्षा जरा वेगळे आहेत. १९ वर्षांची ही सुंदर बाला रायफल हातात घेऊन जंगलात जाते आणि प्राण्यांची शिकार करते... बरं नुसते ससे अन् हरणं मारून तिचं मन भरत नाही तर स्वतःच्या धाडसाचा परिचय करून देत अस्वल, चित्त्यांनाही ती बंदुकीने निशाणा बनवते... आतापर्यंत तिने अनेक जंगली म्हशी, अस्वल, लांडगे, चित्ते, हरणींची शिकार केली आहे. ९ वर्षांची असताना तिला शिकारीची हौस जडली होती. आज तिने शिकारींच्या बाबतीत अमेरिकेची प्रसिद्ध महिला साराह पॉलिनलाही मागे टाकले आहे. साराहला शिकारीची भलतीच हौस होती. तिच्यापासूनच रेगिसला प्रेरणा मिळाली. केवळ रेगिसच नाही तर साराहपासून प्रेरित होऊन अनेक महिला नॅशनल रायफल असोसिएशनमध्ये प्रशिक्षणासाठी येत आहेत. साराहामुळे प्रशिक्षणार्थी महिलांमध्ये २० टक्क्यांनी वाढ झाली आहे. हत्यारे बनवणाऱ्या कंपन्यांनीही आता महिलांना हाताळायला सोपी जातील, अशी हत्यारे बनवायला सुरुवात केली आहे. रेगिसचे पिता डोग गिलेस हे रेडिओ कंपनीत काम करतात. धाडसाचे आणि शिकारीचे धडे त्यांनी रेगिसला लहानपणापासूनच दिले. रेगिस सांगते, की फ्लोरिडाच्या जंगलात प्राण्यांची कमी नाही. शिकारीच्या सवयीमुळे मी अनेक घनदाट जंगलात जाऊन आली आहे. प्राण्यांची शिकार करताना रोमांचक अनुभव येतात. ते मी माझ्या ब्लॉगवर लिहित असते. गेल्या पूर्ण दशकात मी अनेक हिंस्त्र प्राण्यांची शिकार केली आहे. माझे काही मित्र माझ्या शिकारीच्या सवयीमुळे नाराज आहेत. पण त्यांच्यासोबत मी वाद घालत नाही. माझ्यासारख्या शिकारींमुळे वन संरक्षण विभागाला मदत मिळते. गेल्या वर्षी शिकाऱ्यांकडून वसूल करण्यात आलेल्या करापोटी २९.४ कोटी डॉलरची मदत वन विभागाला झाली. दिसायला नाजूक, सुंदर रेगिसच्या अंगी इतके धाडस पाहून सर्वांनाच आश्चर्य वाटतं...





## मनात आले तर खाऊन टाका ग्लॅमर गर्ल!

**बीजिंग :** एकापेक्षा एक सुंदर मॉडेल्स बघितल्यावर पुरूषांच्या तोंडातून नकळत काय प्रतिक्रिया उमटतात, हे आपणास माहितच असेल. या प्रतिक्रिया आता केवळ शब्दापुरत्या मर्यादित राहणार नाहीत. प्रत्यक्षात तसा अनुभवही घेता येईल, अशी सुविधा बीजिंगचा कलाकार जू डुओकी याने केली आहे. त्याने पत्ताकोबीपासून वेगवेगळ्या मॉडेल्सच्या प्रतिकृती साकारल्या आहेत. ज्या आपण मनात आले तर खाऊनही टाकू शकतो. फॅन्टेसिज ऑफ चायनिज कॅबेज प्रोजेक्ट अंतर्गत डुओकीने या अनोख्या आणि आकर्षक कलाकृती बनवल्या. या कलाकृतींमध्ये मॉडेल्स वेगवगेळ्या पोजमध्ये आहेत. अशा पोजेस केवळ फॅशन मॅगेझिनमध्येच बघायला मिळतात. डुओकींनी या कलाकृतींतील प्रत्येक गोष्ट पत्ताकोबीपासून साकारली आहे. मॉडेल्सचे कपडे, ज्वेलरी, टोपी सर्व काही पत्ताकोबीचेच तयार केले आहे. एखादी मॉडेल सोफ्यावर झोपलेली आहे तर एखादी कंबरेवर हात देऊन उभी आहे. काही अभिनेत्र्यांसारख्या टॉवेल स्वतःला गुंडाळून उभ्या आहेत. अशा वेगवेगळ्या कलाकृती बनवणे अवघड काम होते. अनेकदा कलाकृती तयार करताना मध्येच तुटायची. त्या वेळी पुन्हा सर्व कलाकृती तयार करावी लागायची, असे डुओकी म्हणाला. त्याने कलाकृती बनविण्यासाठी चायनिज पत्ताकोबीचा वापर केला आहे. डुओकीला कॉलेज जीवनापासून अशा प्रकारच्या कलाकृती साकारण्याचे वेड आहे. त्याने यापूव अनेक अभिनेत्यांच्या कलाकृतीही बनवल्या होत्या.







# इतिहास घडविणाऱ्या खेळाडूंच्या आठवणी जपण्याचा उपक्रम अभिनव –मुख्यमंत्री फडणवीस




**मुंबइ (प्रतिनिधी)** – ज्या खेळाडूंनी इतिहास घडवला, त्यांच्या आठवणी कायम जिवंत ठेवण्यासाठी मुंबई क्रिकेट असोसिएशनने आपल्या आयकॉनिक खेळाडूंच्या कार्याचा सन्मान करण्यासाठी घेतलेला हा उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे. वानखेडे स्टेडियमसारख्या ऐतिहासिक ठिकाणीच अशा प्रकारचा सन्मान सर्वोत्तम पद्धतीने होऊ शकतो, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वानखेडे स्टेडियमवर एकनाथ सोलकर गेट, डायना एडुलजी गेट आणि दिलीप सरदेसाई गेट असे नामकरण तर रवी शास्त्री स्टँडचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, क्रिकेटपटू सुनील गावसकर, दिलीप वेंगसरकर, रवी शास्त्री, डायना एडुलजी, सूर्यकुमार यादव तसेच मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अजिंक्य नाईक, उपाध्यक्ष जितेंद्र आव्हाड, उन्मेष खानविलकर, अरमान मलिक, अभिनेता जॅकी श्रॉफ आणि क्रिकेटप्रेमी उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी सुनील गावस्कर, दिलीप वेंगसरकर, एकनाथ सोलकर, दिलीप सरदेसाई, डायना एडुलजी आणि रवी शास्त्री यांसारख्या दिग्गजांच्या योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख केला. सुनील गावस्कर यांनी हेल्मेटशिवाय वेगवान गोलंदाजांचा निर्भीडपणे सामना करत भारतीय क्रिकेटला नवी दिशा दिली. दिलीप वेंगसरकर यांनी कठीण प्रसंगी संघ सावरण्याची भूमिका निभावली, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. एकनाथ सोलकर यांच्या अफाट क्षेत्ररक्षण कौशल्याचा उल्लेख करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळातही त्यांची फील्डिंग अद्वितीय ठरली असती. तसेच दिलीप सरदेसाई यांच्या परदेशातील कामगिरीमुळे भारतीय क्रिकेटला नवे स्थान मिळाल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

महिला क्रिकेटच्या क्षेत्रात डायना एडुलजी यांच्या योगदानाची दखल घेत, त्यांनी महिलांच्या क्रिकेटमध्ये झालेल्या प्रगतीचे कौतुक केले. तसेच रवी शास्त्री यांच्या अष्टपैलू कामगिरीचा उल्लेख करत त्यांच्या खेळाडू, प्रशिक्षक आणि समालोचक म्हणूनच्या भूमिकेचेही त्यांनी कौतुक केले.

आधुनिक क्रिकेटमधील स्टार खेळाडू सूर्यकुमार यादव यांच्या अभिनव फलंदाजी शैलीचे विशेष कौतुक करत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ३६० डिग्री खेळ करणारे सूर्यकुमार यादव हे मुंबईच्या क्रिकेट संस्कृतीचे उत्तम उदाहरण आहेत. त्यांच्या कामगिरीमुळे मुंबईचा गौरव वाढला आहे.

# भोंदू अशोक खरात प्रकरणात प्रतिभा चाकणकरांना पोलिसांची नोटीस



**मुंबई (प्रतिनिधी)** – भोंदू अशोक खरात प्रकरणात मोठी घडामोड समोर आली असून रुपाली चाकणकर यांच्या कुटुंबाच्या अडचणीत आणखी वाढ झाली आहे. त्यांच्या भगिनी प्रतिभा चाकणकर यांना शिर्डी पोलिसांकडून नोटीस बजावण्यात आली आहे. पुढील पाच दिवसांत त्यांना चौकशीसाठी हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

या प्रकरणाचा संबंध समता पतसंस्थेतील संशयास्पद खात्यांशी जोडला जात असून, कोट्यवधी रुपयांच्या व्यवहारांचा तपास सुरू आहे. तपासात प्रतिभा चाकणकर यांच्या नावावर दोन आणि त्यांच्या मुलांच्या नावावर दोन अशी एकूण चार खाती असल्याचे समोर आले आहे. या चार खात्यांमधून सुमारे २ कोटी ४० लाख रुपयांचे व्यवहार झाल्याची धक्कादायक माहिती पुढे आली आहे. या पैशांचा स्रोत आणि व्यवहारांची साखळी काय, याचा शोध पोलीस घेत आहेत.

दरम्यान, अशोक खरात याच्यावर शिर्डीत सावकारीचा गुन्हाही दाखल करण्यात आला आहे. त्याचे या पतसंस्थेशी असलेले संबंधही संशयास्पद असल्याचे तपासात उघड झाले आहे. सध्या पोलिसांकडून खातेदारांचे जबाब नोंदवले जात असून आतापर्यंत ३३ जणांची चौकशी पूर्ण झाली आहे.

या प्रकरणाचा विस्तार सिन्नरपर्यंत पोहोचला असून तेथील जगदंबा पतसंस्था मध्येही अशोक खरात नॉमिनी असलेली ३२ खाती आढळली आहेत. या खात्यांची चौकशी नाशिक पोलीस करत आहेत. दोन वेगवेगळ्या शहरांतील पतसंस्थांमध्ये एकाच व्यक्तीचे इतके मोठे नेटवर्क असल्याने हे प्रकरण मोठ्या रॅकेटचे असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# अमेरिकेचा १८०० कोटींचा ड्रोन होर्मुझवरून बेपत्ता



**तेहरान (वृत्तसंस्था)** – अमेरिका आणि इराणमध्ये नुकताच १४ दिवसांचा युद्धविराम जाहीर झाला असला, तरी इराणच्या आखातातील परिस्थिती पुन्हा एकदा स्फोटक बनली आहे. अमेरिकेचे अत्यंत प्रगत आणि महागडे MQ-4C Triton हे पाळत ठेवणारे ड्रोन हॉर्मुझच्या आखातातून बेपत्ता झाले आहे. या घटनेमुळे अमेरिकन संरक्षण विभागात खळबळ उडाली असून, इराणने हे ड्रोन पाडले असावे, असा संशय व्यक्त केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हे ड्रोन इराणच्या किनारपट्टीजवळ गस्त घालत होते. यावेळी अचानक रडारवरून गायब झाले. युद्धविराम घोषित झाल्यानंतर अवघ्या काही तासांतच ही घटना घडल्याने शांतता चर्चेवर टांगती तलवार निर्माण झाली आहे. अमेरिकन नौदलाने अद्याप अधिकृतपणे याला दुजोरा दिला नसला तरी, शोध मोहीम वेगाने सुरू केली आहे. यापूर्वी २०१९ मध्ये इराणने अमेरिकेचे 'ग्लोबल हॉका ड्रोन' याच भागात पाडले होते. ताज्या घटनेनंतर इराणच्या लष्करी अधिकाऱ्यांनी कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही. मात्र, इराणच्या सरकारी माध्यमानी विदेशी घुसखोरी खपवून घेतली जाणार नाही, असा इशारा दिला आहे. तज्ज्ञांच्या मते, जर इराणने हे ड्रोन पाडले असेल, तर सुरू झालेला युद्धविराम संकटात येऊ शकतो.

हे ड्रोन केवळ पाळत ठेवण्यासाठी नाही, तर गुप्तचर माहिती गोळ्य करण्यासाठी जगातील सर्वात प्रगत यंत्रणांपैकी एक मानले जाते. याची किंमत सुमारे १८० दशलक्ष डॉलर्स इतकी असून, ते २४ तासांहून अधिक काळ ५०,००० फुट उंचीवर उडू शकते. अशा हाय-टेक ड्रोनचे बेपत्ता होणे हा अमेरिकेसाठी मोठा लष्करी आणि राजनैतिक धक्का मानला जात आहे.

# आठवड्याच्या अखेरीस सेन्सेक्स आणि निफ्टीत लक्षणीय वाढ

**मुंबई (प्रतिनिधी)** – पश्चिम आशियातील युद्धामुळे अमेरिकेत कर्ज महाग झाले आहे. याउलट भारतात रेपो रेट स्थिर आहे. यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेविषयीचा गुंतवणूकदारांमधील विश्वास वाढला आहे. याचा भारतीय शेअर बाजाराला फायदा होत असल्याचे दिसत आहे. आठवड्याच्या अखेरीस बंद होताना शेअर बाजारात तेजी दिसली. सेन्सेक्स आणि निफ्टीत घसघशीत वाढ झाली.

सेन्सेक्स १.१८ टक्क्यांच्या वाढीसह ७७,५३५ वर तर निफ्टी २७५ अंकांनी वधारून २४,०५० वर बंद झाला. भारतीय अर्थव्यवस्थेविषयीचा गुंतवणूकदारांमधील विश्वास वाढल्याचा सकारात्मक परिणाम शेअर बाजारात दिसला. एशियन पेंट्सच्या शेअरमध्ये ३.८४ टक्क्यांची, आयसीआयसीआय बँकेच्या शेअरमध्ये ३.१३ टक्क्यांची, महिंद्रा अँड महिंद्राच्या शेअरमध्ये ३.०५ टक्क्यांची, इंडिगोच्या शेअरमध्ये २.७७ टक्क्यांची आणि एसबीआयच्या शेअरमध्ये २.५१ टक्क्यांची वाढ दिसली. सन फार्माच्या शेअरमध्ये ३.६५ टक्क्यांची, इन्फोसिसच्या शेअरमध्ये २.९४ टक्क्यांची, टीसीएसच्या शेअरमध्ये २.४५ टक्क्यांची, टेक महिंद्राच्या शेअरमध्ये १.६० टक्क्यांची, एचसीएल टेकच्या शेअरमध्ये ०.९० टक्क्यांची घसरण दिसून आली.

# ४५१ सिलिंडरसह ४० लाखांचा मुद्देमाल जप्त




**मुंबई (प्रतिनिधी)** – दक्षिण मुंबईतील वाडीबंदर परिसरात अवैध गॅस साठवणूक आणि वाहतूक करणाऱ्या रॅकेटचा शिधावाटप यंत्रणेने पर्दाफाश केला आहे. एका गुप्त माहितीच्या आधारे टाकलेल्या धाडीत यंत्रणेने ४५१ सिलिंडर आणि ८ वाहनांसह तब्बल ४० लाख ६१ हजार ७१६ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वाडीबंदर ब्रीज आणि डोंगरी परिसरात गॅस सिलिंडरची अवैध वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा विभागाचे नियंत्रक चंद्रकांत डांगे यांना मिळाली होती. त्यानुसार डांगे यांनी दिलेल्या विशेष आदेशांनंतर या परिसरात सापळा रचण्यात आला. या मोहिमेत गॅस सिलिंडरची अवैध वाहतूक करणाऱ्या ८ गाड्या ताब्यात घेण्यात आल्या. त्यात घरगुती आणि व्यावसायिक वापराचे एकूण ४५१ सिलिंडर आढळून आले.

ही कारवाई उपनियंत्रक (अंमलबजावणी) गणेश बेल्लाळे आणि उपनियंत्रक (परिमंडळ 'अ') माधुरी शिंदे यांच्या संयुक्त मार्गदर्शनाखाली पार पडली. प्रत्यक्ष घटनास्थळी सहाय्यक शिधावाटप अधिकारी प्रदीप यादव यांच्या नेतृत्वाखाली पथकाने हा सापळा यशस्वी केला. या पथकात भूपेंद्र गवळी, महेश देशपांडे, राहुल साळुंखे यांच्यासह अन्य १४ कर्मचाऱ्यांचा समावेश होता.

जीवनावश्यक वस्तूंचा काळाबाजार किंवा अवैध साठवणूक करून सर्वसामान्यांची लूट करणाऱ्यांविरुद्ध ही मोहीम उघडण्यात आली आहे. अशा प्रकारची कृत्ये कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतली जाणार नाहीत. येणाऱ्या काळातही संशयास्पद हालचालींवर आमचे बारीक लक्ष असेल आणि यापेक्षाही कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा चंद्रकांत डांगे यांनी यावेळी दिला. या प्रकरणातील आरोपींवर जीवनावश्यक वस्तू कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, या रॅकेटची मुळे नेमकी कुठे पोहोचली आहेत, याचा शोध प्रशासन घेत आहे.

# जस्टिस यशवंत वर्मा यांचा राजीनामा

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. न्यायमूर्ती वर्मा यांनी आपला राजीनामा राष्ट्रपतींकडे पाठवला असल्याची माहिती समोर आली आहे. मार्च २०२५ मध्ये त्यांच्या निवासस्थानी मोठ्या प्रमाणात रोख रक्कम जळलेली आढळल्याच्या न्यायमूर्ती वर्मा देशभरात चर्चेचा विषय ठरले होते.

न्यायमूर्ती वर्मा दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश असताना १४ मार्च २०२५ रोजी त्यांच्या दिल्लीतील सरकारी निवासस्थानी आग लागली होती. आग विझवण्यासाठी आलेल्या अग्निशमन दलाला त्यांच्या घरातील स्टोअर रूममध्ये जळालेल्या नोटांच्या मोठ्या गड्ड्या आढळून आल्या होत्या. त्या वेळी न्यायमूर्ती वर्मा घरी उपस्थित नव्हते; ते मध्य प्रदेशात होते.

# गाजीपुरमध्ये यात्रेकरूंच्या बसला अपघात; महाराष्ट्रातील दोन महिलांचा मृत्यू

**गाजीपूर (वृत्तसंस्था)** – उत्तर प्रदेशातील गाझीपूर जिल्ह्यात महाराष्ट्रातील भाविकांच्या बसचा अपघात झाला आहे. गुरुवारी घडलेल्या या हृदयद्रावक घटनेत दोन महिलांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर ३५ प्रवासी जखमी झाले आहेत. वाराणसी-गोरखपूर महामार्गावर भाविकांची पर्यटक बस अनियंत्रित होऊन उलटल्याने हि घटना घडल्याची माहिती आहे. यात बुलढाण्यातील भाविक - श्रद्धाळूंच्या समावेश असून गाझीपूरजवळ हा अपघात घडला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले असून त्यांनी पुढील कारवाई सुरु केलीय. तर जखमींवर सध्या गाझीपूर सिव्हिल रुग्णालयाला उपचार सुरु आहे.

मिळेलेल्या माहितीनुसार केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या सूचनेनंतर शिवसेनेची टीम देखील घटनास्थळी पोहचली असून मदत कार्य सध्या सुरु आहे. या बस मध्ये एकूण ३८ भाविक असून ते तीर्थदर्शनासाठी निघाले होते. यातील ३५ यात्रेकरू जखमी असून त्यापैकी तिघांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे. तर ३२ यात्रेकरू किरकोळ जखमी असून दोन महिलांचे दुर्दैवी निधन झाले आहे. यातील एक महिला बुलाढाण्यातील रहिवाशी असून एक अकोला जिल्ह्यातील असल्याची प्राथमिक माहिती आहे. दरम्यान, दोन्ही पार्थिव त्यांच्या गावी पाठवण्याची व्यवस्था करण्यात आली असल्याची माहिती आहे.


## टी.सी. हरवली

माझी मुमताज बेगम सय्यद आरेफ या नावाची ईयत्ता सहावी पासची टी.सी. वर्कशॉप ते शिवाजीनगर ऑटो प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**पत्ता. नई आबादी, नांदेड**
**मो.नं. ९९७५८७८५७३**

## टी.सी. हरवली

माझी तहेसीन बेगम नाजीयोद्दीन या नावाची ईयत्ता सातवी पासची टी.सी. वर्कशॉप ते शिवाजीनगर ऑटो प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**पत्ता. नई आबादी, नांदेड**
**मो.नं. ९५२७८६७८१०**

## टी.सी. हरवली

माझी साईप्रकाश श्यामसुंदर मेटकर या नावाची डिप्लोमा ईन सिव्हील इंजिअर २०१४-१५ पासची टी.सी. भोकर ते नांदेड प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**पत्ता. साईप्रकाश श्यामसुंदर मेटकर**
**रा. वडार गल्ली, भोकर ता. भोकर जि.नांदेड मो.नं. ९९२३९२४३५४**

## पाहिजेत

**जुना मोंढा, नांदेड येथील ड्रायफ्रूट दुकानात काम करण्यासाठी मुलांची आवश्यकता आहे.**
**पगार : रु. १५००० ते १८००० प्रति महिना देण्यात येईल. ठिकाण: फ्रेंड्स जर्दा स्टोअर जुना मोंढा, नांदेड**
**इच्छुक व गरजू उमेदवारांनी तात्काळ संपर्क साधावा.**
**संपर्क** (Contact) : **8688969755**

## जाहीर प्रगटन

विषयः- जिल्हयातील सर्व हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदान कायदा 1954 चे कलम 6(3) नुसार झालेल्या जमिनीचे कृषक/अकृषक हस्तांतरण नियमीत करुन भोगवटदार वर्ग 2 चे भोगवटदार वर्ग-1 मध्ये रुपांतर करणेबाबतच्या प्रकरणातील माहिती सादर करणेबाबत
संदर्भ:- मा.अप्पर जिल्हाधिकारी नांदेड यांचे अ.शा.पत्र क्र.2025/साशा/1/भुसूधार/कावी-दि.11/12/2025

**देगलूर तालुक्यातील** सर्व जनतेस कळविण्यात येते कि,मुंबई कनिष्ठ गावकरी वतन निर्मुलन कायदा 1958चे कलम 5(1)नुसार झालेल्या जमिनीचे कृषक प्रयोजनासाठी झालेले हस्तांतरण नियमीत करुन भोगवटदार वर्ग 2 चे भोगवटदार वर्ग-1 मध्ये रुपांतर करणेबाबतच्या प्रकरणात **मौ.देगलूर येथील सर्वे नं.76/2 गट क्र.314 मधील क्षे.200चौ.मी.**या जमिनीचे **अर्जदार केशाराम पि.भबुताराम चौधरी, हडमताराम पि.करताराम रा.देगलूर** यांनी मा.जिल्हाधिकारी नांदेड यांचे कार्यालयास अर्ज देऊन विनंती केली आहे.

उक्त प्रकरणात सदर जमिनीबाबत खालील मुद्याप्रमाणे कोणाचे आक्षेप आहेत काय?

1. खरेदीखत अधिकार अभिलेखाबाबत न्यायालयीन वाद किंवा न्यायालयात प्रकरणे चालू आहे किंवा कसे?
2. जमीन वक्फ मालमत्ता आहे किंवा कसे?
3. सदर जमीन संपादन झाली आहे किंवा कसे ?
4. सदर जमिन खिदमतमाश आहे काय? (होय/नाही)

तसेच सदरील जमिनीचे कृषक/अकृषक हस्तांतरण नियमीत करुन भोगवटदार वर्ग 2 चे भोगवटदार वर्ग-1 मध्ये रुपांतर करणेबाबत कोणाचा आक्षेप असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्दी पासून 7 (सात) दिवसाचे आत तहसिल कार्यालय देगलूर येथे हजर राहून आपला आक्षेप नोंदविण्यात यावा.

उक्त कालावधीनंतरचे आक्षेप ग्राहय धरले जाणर नाहीत व सदरील **मौ.देगलूर येथील सर्वे नं.76/2 गट क्र.314 मधील क्षे.200चौ.मी.** या जमिनीचे हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदान कायदा 1954 चे कलम 6(3) नुसार झालेल्या जमिनीचे कृषक/अकृषक हस्तांतरण नियमीत करुन भोगवटदार वर्ग 2 चे भोगवटदार वर्ग-1 मध्ये रुपांतर करण्याची कार्यवाही अनुसरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

तहसिलदार देगलूर

## E-TENDER NOTICE

MAHAVITARAN

**Invitation for Bids, E-Tender Notice T-01**

The Superintending Engineer (O&M Circle, Nanded) on behalf of MSEDCL (Employer) invites the bids from reputed agencies for E-Tender ***"Work of Testing of Power Transformer Main Tank Oil and OLTC Oil samples at site by mobile testing lab at various S/s under O&M Circle Nanded"***
**SE/NDC/TS/2026-27/T-01 of Rs. 64.38 Lakhs**

The Tenders will be processed only in Electronic Tendering mode and open for registered contractors on e-Tendering system for work contracts of MSEDCL. Tender documents can be downloaded from employer's website site https://etender.mahadiscom.in/eatApp/ up to **Dt. 17.04.2026** after payment of E-tender fees online. For more details, please contact Ex. Engineer (Adm), Nanded Circle. **Mob. No: 7875469726**

This office reserves all the right to reject any or all the offers without assigning any reason thereof.

**PRO No.008**
**Dt. 09.04.2026**
**Superintending Engineer**
MSEDCL, Circle Office Nanded

## Change In Name

My Old Name is **HINA PARVEEN** which now I am changing as New Name **HEENA PARVEEN.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address - R/o. H.No. 1-7-910-3, Peer Nagar, Nanded 431605**
**Mo.No. 9860084336**

## CHANGE IN NAME

MY OLD NAME IS **GHONSHIKAR RAMAKANT SHRINIWASRAO**, WHICH I AM CHANGING AS A NEW NAME **GHONSIKAR RAMAKANT SHRINIWASRAO.** HENCE FOR MY ALL CORRESPONDENCE WILL BE DONE AS PER MY NEW NAME. PLEASE CONSIDER THE SAME.
CONTACT :
**GHONSIKAR RAMAKANT SHRINIWASRAO**
**2-12-141, RAGHUVANSH NIWAS,**
**VAJIRABAD, NANDED - 431601 (M.S.)**
**MOB.9420415808, 9921758520.**

## Change In Name

My Old Name is **Raju Vanketrao Akade** which now I am changing as New Name **Raju Venkatrao Akde.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address - Raju Venkatrao Akde**
**Vidhya Nagar, Nilanga Dist. Latur**
**Mo.No. 9175995006**

## जाहिरप्रगटन

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात,
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९१/२०२६ पुढील तारीख – ०८.०५.२०२६

अर्जदार : काशीनाथ पि. व्यंकटेशराव कुंचनवार,
वय – ५७ वर्षे, व्यवसाय – शेती व व्यापार,
रा. बिलोली , ता. बिलोली जि. नांदेड.

विरुध्द.

गैरअर्जदारः ०१.सौ. शशीकलाबाई भ्र. व्यंकटेशराव कुंचनवार, वय – ७३ वर्षे, व्यवसाय – निरंक,
रा. बिलोली विठ्ठल मंदीराजवळ ता. बिलोली जि. नांदेड.

०२.विश्वनाथ पि. व्यंकटेशराव कुंचनवार, वय – ५७ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त शेती व व्यापार पासून
रा. बिलोली ता. बिलोली जि. नांदेड.

०३. रमेश पि. व्यंकटेशराव कुंचनवार,
वय – ५७ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त शेती व व्यापार पासून
रा. बिलोली ता. बिलोली जि. नांदेड.

०४. विजय पि. व्यंकटेशराव कुंचनवार,
वय – ५७ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त शेती व व्यापार पासून
रा. बिलोली ता. बिलोली जि. नांदेड.

०५. सौ. शकुंतलाबाई भ्र. दिलीप कुमार कोमवार,
वय – ५५ वर्षे, व्यवसाय – घरकाम,
रा. नांदेड मारोती मंदीराजवळ, शास्त्री नगर, भावसार चौक, नांदेड.

०६. सौ. शोभाबाई भ्र. गोरुंटीवार, वय – ५३ वर्षे, व्यवसाय – घरकाम,
रा. निझामाबाद विनायक नगर, निझामाबाद.

विषय– वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत..

ज्याअर्थी अर्जदार हयांनी मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार व गैरअर्जदार क्रमांक ०१ ते ०६ हे **मयत व्यंकटेश हानमलू कुंचनवार** यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराने कथन केले आहे की, अर्जदार हा **मयत व्यंकटेश हानमलू कुंचनवार** यांचा मुलगा असुन गैरअर्जदार क्रामंक ०२ हि **मयत व्यंकटेश हानमलू कुंचनवार** यांची पत्नी आहे गैरअर्जदार क्रमांक ०२ ते ०४ हे

जापानपामु / २०२८ कार्यालय नगर परिषद मुखेड
दिनांक: १०/०५/२०२६
जाहीर प्रगटन

## मुखेड नगर परिषद मुखेड

विषय :- नविन नोंद करणे बाबत.

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार श्री संतोष बाबुराव घाळेवाड हे रा. मुखेडचे असुन मुखेड नगर परिषदेच्या हद्दीतील सर्वे नं.३८५. प्लॉट नं. १०५ वार्ड न. (०१) हे श्री विरभद्र गृहनिर्माण सहकारी संस्था म. वाक्लीकनगर, मुखेड यांचे कडुन कायमचे खरेदी खत/कोर्ट डिग्री /करून घेतले असुन खरेदी खताची कोर्ट डिकीची/झेरॉक्स प्रत अनुसुची फॉर्म २ अनुसुची फॉर्म ३ अर्जासोबत देऊन सदरिल खरेदी खताआधारे /कोर्ट डिकीच्या अर्जदाराच्या नावाने नगर परिषदेच्या अभिलेखात नविन नोंद घेण्यात यावी अशी विनंती केली आहे.

तरी सदरील घराच्या नोंदणी संबंधी कोणास आक्षेप असेल तर त्यांनी येत्या ०७ (पंधरा दिवसाचे आत नगर परिषद कार्यालयात कार्यालयीन वेळेत लेखी पुराव्यासह आक्षेप सादर करावेत. नसता मुदतीनुसार अर्जदाराच्या नावाने खरेदी खताआधारे/कोर्ट डिकीच्या आधारे नगर परिषदेच्या अभिलेखात नविन नोंद घेण्यात येईल.

चार्तुसिमा:
पुर्वेस – व्यंकट श्रीमंगाले / नागोराव माधव जिनेवाड
पश्चिमेस:--रोड
दक्षिणेस – मारोरी जयराम फुलारी
उत्तरेस:- पाशा इसाक शेख

मुख्याधिकारी
नगर परिषद .मुखेड,

## जाहीर प्रगटन

मौजे फत्तेजंगपूर ता.जि. नांदेड मनपा हद्दीतील शेत गट नं. २४,२५,२६ च्या एकत्रित गटापैकी गट नं. २६ मधील प्लॉट नं. १२९ साईज लांबी – पूर्वःपश्चिम – ४० फूट व रूंदी दक्षिणःउत्तर – ३० फूट ज्याचे एकूण क्षेत्रफळ १२०० चौ.फुटाचा प्लॉट महेश तुकाराम डोके रा. मातकुळी ता. आष्टी जि. बीड यांच्याकडून लक्ष्मण रामन्ना म्याकलोड रा. शिंपाळा ता. बिलोली जि. नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

प्लॉटची चतुःसिमा- पूर्वेस – २० फुट रूंद रोड, पश्चिमेस – प्लॉट नं. १४०, दक्षिणेस – २० फुट रूंद रोड व उत्तरेस – प्लॉट नं. १२८.

तरी वरील चतुःसिमेच्या आतील प्लॉट बद्दल कोणाचा हक्क, उजर, दावा, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर, आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेला उजर, आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉटचे खरेदीखत लक्ष्मण रामन्ना म्याकलोड यांच्या नावे करून घेण्यात येईल.


करीता हे जाहीर प्रगटन.

**जाहीर प्रगटन देणार**
**लक्ष्मण रामन्ना म्याकलोड**
**रा. शिंपाळा ता. बिलोली जि. नांदेड**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रॅडन, लॅबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




# ७०२ डिजिटल सातबारा व ६६९ आठ-अ उताऱ्यांचे वाटप; १० जणांना संजय गांधी योजनेचा लाभ

## महाराजस्व समाधान शिबिराच्या माध्यमातून उत्तम महसूल सेवेचा अंमल -आ. बोंढारकर

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** –शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज स्वराज्य समाधान शिबीर अभियान (टप्पा क्र. १) अंतर्गत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ व तहसीलदार संजय वारकड यांच्या निर्देशानुसार तालुक्यातील तिसरे शिबीर विष्णुपुरी येथे उत्साहात पार पडले. विविध शासकीय सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिल्यामुळे या शिबिराला परिसरातील नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.



या शिबिरामध्ये ७०२ डिजिटल सातबारा व ६६९ आठ-अ उताऱ्यांचे वाटप करण्यात आले असून, १० जणांना संजय गांधी योजनेचा लाभ देण्यात आला आहे. शिबिरात ग्रामविकास, आरोग्य, कृषी, भूमिअभिलेख (मोजणी) तसेच दुय्यम निबंधक, महावितरण विभागासह विविध शासकीय विभागांनी सहभाग घेतला. संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी नागरिकांना शासनाच्या विविध योजनांची माहिती देत लाभार्थ्यांकडून अर्ज स्वीकारले. यावेळी बोलताना आ. बोंढारकर म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराच्या माध्यमातून उत्तम महसूल सेवेचा अंमल होत आहे.

तहसील कार्यालय, नांदेड यांच्या वतीने शिबिरात महसुली सेवांचे मोठ्या प्रमाणावर वितरण करण्यात आले. यामध्ये ७०२ ऑनलाईन सातबारा उतारे व ६६९ आठ-अ उतारे नागरिकांना देण्यात आले. तसेच १० पात्र लाभार्थ्यांना संजय गांधी निराधार योजनेचा लाभ प्रदान करण्यात आला. याशिवाय फेरफार संदर्भातील अर्जही स्वीकारण्यात आले.

शिबिरामध्ये उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, सातबारा, ८-अ उतारे, सातबारा दुरुस्ती, फेरफार नोंदी आदी महसुली सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. तसेच आरोग्य विभाग, भूमिअभिलेख विभाग व पंचायत विभागानेही नागरिकांना विविध सेवा पुरवल्या.

या कार्यक्रमास मतदारसंघाचे आमदार आनंदराव बोंढारकर यांनी कार्यक्रमाच्या ठिकाणी विविध विभागांच्या स्टॉल्सला भेटी देऊन नागरिकांचे विविध प्रश्न ऐकून संबंधित विभागाला तत्काळ सदर प्रश्न निकाली काढण्यासंदर्भात सूचना केल्या.

यावेळी आमदार यांनी तहसील कार्यालयामार्फत देण्यात येणारे विविध प्रमाणपत्रे विहित मुदतीत देत असल्याबाबत समाधान व्यक्त केले. छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेस अभिवादन करून दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाला नांदेड दक्षिणचे आमदार बोंढारकर यांनी मार्गदर्शन केले. नायब तहसीलदार स्वप्नील दिगलवार यांनी प्रास्ताविकातून अभियानाची रूपरेषा स्पष्ट केली. नायब तहसीलदार अनिल म ाचेवाड यांनी सूत्रसंचालन केले, तर मंडळ अधिकारी श्रीकृष्ण एलमटे यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. पुरवठा विभागातील श्रीमती मारतळेकर, श्रीमती पवार यांनी नागरिकांच्या समस्या ऐकून त्यांचे निराकरण केले.

तालुक्यातील सर्व मंडळ अधिकारी व तलाठी यांनी उपस्थित राहून अभियानास सहकार्य केले. शिबीर यशस्वी करण्यासाठी मंडळ अधिकारी श्रीकृष्ण एलमटे, तलाठी रमेश गिरी, मनोज जाधव, मनोज सरपे, माधव भिसे, महसूल सेवक बालाजी सोनटक्के यांनी विशेष योगदान दिले. शासनाच्या विविध सेवा व योजनांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्यामुळे ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

# इंस्टाग्राम आयडीवर आक्षेपार्ह पोस्ट; गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहराच्या देगलूर नाका परिसरातील इकबालनगर येथील एकाने आपल्या इंस्टाग्राम आयडीचा वापर करीत आक्षेपार्ह पोस्ट प्रसारित करून समाज माध्यमात दहशत निर्माण केली. याप्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात शेख शब्बीर शेख युसूकविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

देगलूर नाका भागातील शेख शब्बीर शेख युसूफ (वय ४०) याने ५ एप्रिल रोजी आपल्या इंस्टाग्राम आयडीचा वापर करून आक्षेपार्ह पोस्ट प्रसारित करून समाज माध्यमात दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला. ही बाब पोलिसांच्या सायबर सेलने हेरून नांदेड ग्रामीण पोलिसांना माहिती दिली. यावरुन पोलिसांनी त्याला अटक केली

पोलिसांनी मोबाईलसुद्धा जप्त केला आहे. पोलीस अंमलदार शेख असीम शेख अजगर अली यांच्या फिर्यादीवरून सार्वजनिक उपद्रव पसरविणे या कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. तपास पोलीस हवालदार सत्तार करत आहेत.

# नांदेडच्या नंदगिरी किल्ल्याच्या विकासासाठी निधी देण्यात यावा

## अंदाज समितीच्या बैठकीत माजी राज्यमंत्री सदाभाऊ खोत यांची सूचना



**नांदेड (प्रतिनिधी)** – जिल्ह्याचे ऐतिहासिक वैभव असलेल्या नंदगिरी किल्ल्याच्या विकासासाठी भरीव निधी उपलब्ध करून देण्यात यावा अशी सूचना अंदाज समितीचे सदस्य माजी राज्यमंत्री सदाभाऊ खोत यांनी अंदाज समितीच्या बैठकीत शुक्रवारी केली.

नांदेड जिल्ह्याचे प्राचीन वैभव असलेला नंदगिरी किल्ला नामशेष होण्याच्या मार्गावर होता. गडप्रेमी असलेले अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांनी किल्लेदारांची फौज तयार करून गेल्या तीन वर्षांपासून दर रविवारी मोहिमा राबवून किल्ला प्रकाशझोतात आणून शासनाचे लक्ष केंद्रित केले. नंदगिरी किल्ल्याच्या विकासासाठी शासनाने सहा कोटी २९ लाख रुपये निधी मंजूर केला आहे. त्या निधीतून आता विकास कामे सुरू आहेत. मागील आठवड्यात किल्लेदार व नंदगिरी किल्ला संवर्धन संस्था, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने नंदगिरी किल्ला येथे शिवकालीन अस्सल सुवर्ण होन, प्राचीन नाणी, पुरातन शस्त्र, आयुधे यांचे तीन दिवसीय अभिनव प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनाचा हजारो नांदेडकरांनी व आजूबाजूच्या जिल्ह्यातील लोकांनी लाभ घेतला. अंदाज समितीचे अध्यक्ष, सदस्य यांनी नुकताच नांदेड जिल्ह्याचा दौरा केला. या दौऱ्यात व्यस्त असताना देखील अंदाज समितीचे सदस्य माजी राज्यमंत्री सदाभाऊ खोत यांनी आवर्जून शुक्रवारी नंदगिरी किल्ला येथे सकाळी भेट दिली. गोदावरी नदीकाठच्या संपूर्ण किल्ल्याची पाहणी करून सविस्तर माहिती व ईतिहास जाणून घेतला. नंदगिरीच्या किल्लेदारांच्या कामाचे कौतुक केले.

नांदेडचे वैभव व प्राचीन ठेवा असलेल्या नंदगिरी किल्ल्याच्या विकासासाठी डीपीडीसी-मधून अजून निधी उपलब्ध करून देण्यात यावा अशी सूचना अंदाज समितीचे सदस्य माजी राज्यमंत्री सदाभाऊ खोत यांनी अंदाज समितीच्या बैठकीत केली. नंदगिरी किल्ला भेटीच्या वेळी सदाभाऊ खोत यांच्यासोबत मनपाचे लेखा व वित्त अधिकारी धनराज पांडे, जयेश भरणे, सागर ढालकरी, आदित्य नागेश्वर, सोनू टाक आदी नंदगिरीचे किल्लेदार उपस्थित होते.

# जिल्ह्यात जमावबंदी, शस्त्रबंदी आदेश लागू

**नांदेड (प्रतिनिधी)** – नांदेड जिल्ह्यात १२ एप्रिलचे सकाळी ६ वाजेपासून ते २६ एप्रिल २०२६ च्या मध्यरात्रीपर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहेत, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये जिल्ह्यात १२ एप्रिलचे सकाळी ६ वाजेपासून ते २६ एप्रिल २०२६ रोजी मध्यरात्रीपर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहील. त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी या आदेशात नमूद असलेली कृत्ये सार्वजनिक परिसर किंवा त्याच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे. हा आदेश कामावरील पोलीस अधिकारी, शासकीय कर्मचारी, विवाह, अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, यात्रा व इतर सक्षम अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुकांना लागू होणार नाही.

अशा मिरवणुकांना परवानगी देण्याचे अधिकार तसेच पाच व पाचपेक्षा जास्त इसम जमण्यासाठी, सभा, मिरवणुका, मोर्चा काढणे, ध्वनीक्षेपक वाजविण्यास परवानगी देण्याचे अधिकार जिल्ह्यातील पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना तसेच पोलीस अधीक्षक नांदेड यांनी प्राधिकृत केलेल्या इतर पोलीस अधिकारी यांना राहतील असे कळविण्यात आले आहे.

# अवैध दारू विक्री : आरोपीकडून ८७ हजारांची देशी दारू जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहराच्या मालटेकडी रस्त्यावर विमानतळ पोलिसांनी नाकाबंदी दरम्यान कळमनुरी तालुक्यातील तोंडापूर तांडा येथील विशाल राठोड याला अटक केली. त्याच्याकडून विनापरवाना बेकायदेशीररित्या ८७ हजार रुपयांची देशी दारू आणि एक चारचाकी वाहन जप्त करून गुन्हा दाखल केला आहे.

विमानतळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रामदास शेंडगे यांनी वरिष्ठांच्या सूचनेनुसार त्यांनी आपल्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत नाकाबंदी ९ एप्रिल रोजी मध्यरात्री दीडच्या सुमारास लावली होती. यावेळी कळमनुरी तालुक्यातील तोंडापूर तांडा येथे राहणारा विशाल दिलीप राठोड (वय २६) हा (एमएच२६- एएफ- ०७०२) या कारमधून विनापरवाना बेकायदेशीररित्या चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने ८८ हजार ६४० रुपयांची देशी दारू घेऊन जात होता.

नाकाबंदी दरम्यान हा मुद्देमाल पोलिसांच्या तावडीत सापडला. पोलीस हवालदार बालाजी पांचाळ यांनी सदरची देशी दारू व कार जप्त करून विमानतळ ठाण्यात जमा केली आहे. बालाजी पांचाळ यांच्या फिर्यादीवरून विशाल राठोडविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. तपास पोलीस हवालदार किशन चिंतोरे करत आहेत.



नांदेड- शहरातील वजिराबाद भागात उपविभागीय पोलीस अधिकारी (शहर) रामेश्वर व्यंजने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम व त्यांच्या पथकाने एका ठिकाणी कारवाई करून अवैध शस्त्रसाठा (ज्यात तलवार व खंजर) जप्त केला. यावेळी पोलिसांनी एकाला अटक केली आहे.

# सार्वजनिक महात्मा बसवेश्वर जयंतीच्या स्वागताध्यक्षपदी माजी आ. राजूरकर

**नांदेड (प्रतिनिधी)** –अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेच्या वतीने साजरी होत असलेल्या जगत्ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या सार्वजनिक जयंती महोत्सव समितीच्या स्वागताध्यक्षपदी भाजपाचे महानगराध्यक्ष माजी आमदार अमरनाथ राजूरकर यांची आज येथे निवड करण्यात आली.



जगत्ज्योती महात्मा बसवेश्वर यांचा जयंती महोत्सव मागील २५ वर्षांपासून महाराष्ट्रात साजरा करण्यात येतो. ही जयंती शासकीय पातळीवर साजरी होण्यात 'शिवा'चे संस्थापक अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे यांचे महत्वपूर्ण योगदान राहिले आहे. या वर्षीचे हे रौप्यमहोत्सवी जयंती वर्ष असल्यामुळे मोठ्या प्रमाणात व उत्साहात साजरी व्हावी यासाठी प्रा. मनोहर धोंडे यांच्या सूचनेवरून 'शिवा'च्या पदाधिकाऱ्यांची एक बैठक संपन्न झाली.

या बैठकीत माजी आमदार राजूरकर यांनी स्वागताध्यक्षपद स्वीकारून मोठ्या प्रमाणात जयंती उत्सव साजरा करण्यात येईल, असा मनोदय व्यक्त केला.

यावेळी अमरनाथ राजूरकर यांच्यासमवेत भाजपाचे जिल्हा प्रवक्ते संतोष पांडागळे, 'शिवा'चे राज्य उपाध्यक्ष वैजनाथ तोंडसुरे, प्रदेश कार्यकारी अध्यक्ष विठ्ठल ताकबिडे, राज्य सरचिटणीस संजय कोठाळे, जिल्हा संपर्क प्रमुख इंजि. आनंद माळगे, जिल्हाध्यक्ष विलास कापसे, महानगराध्यक्ष गजानन कानडे, धार्मिक आघाडीचे जिल्हाध्यक्ष सिद्धेश्वर स्वामी, उपाध्यक्ष संग्राम काडवदे, नागोराव पाटणी, शिवराज उमाटे, बालाजी दिग्रसकर, काशीनाथ पटने, पिंटू स्वामी, विठ्ठल आळंदे, प्रशांत माळगे, वैभव तमशेटे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# सोनू कल्याणकर खून प्रकरणात एका महिलेसह मारेकऱ्यांना पोलीस कोठडी

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहरातील श्रीनगर परिसरात सोमवार, दिनांक ६ एप्रिल रोजी घडलेल्या सोनू कल्याणकर खून प्रकरणात महत्त्वाची घडामोड समोर आली असून, तुरुंगात असलेल्या गोलू मंगनाळे याच्या आईलाही भाग्यनगर पोलिसांनी अटक केली आहे. न्यायालयाने नव्याने अटक करण्यात आलेल्या महिलेसह एकूण पाच आरोपींना ११ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

दि. ६ एप्रिल रोजी पहाटे सुमारे ५.३० वाजण्याच्या सुमारास श्रीनगर भागात अनिकेत उर्फ सोनू अशोक कल्याणकर (वय ३५) या युवकाचा निर्घृण खून करण्यात आला होता. घटनेनंतर भाग्यनगर पोलिसांनी तत्काळ तपास करीत चंद्रविजय हौसाजीराव मंगनाळे, पियुष उर्फ प्रसाद उर्फ ऋषी शिवाजी शिंदे, मधुसूदन उर्फ कृष्णा माधव जोगदंड आणि रवी उर्फ रोहित राजेश लोट रा. नांदेड या चार आरोपींना अटक केली होती. न्यायालयाने त्यांना १० एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली होती.

दरम्यान तपासात पुढे आलेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी तुरुंगात असलेला आरोपी मुक्तेश्वर उर्फ गोलू चंद्रविजय मंगनाळे याची आई इंदुताई चंद्रविजय मंगनाळे हिला देखील काल सायंकाळी अटक केली. तिची अटक झाल्यानंतर अटकेत असलेल्या चार आरोपींसह सर्वांना शुक्रवार, दिनांक १० एप्रिल रोजी न्यायालयात हजर करण्यात आले.

पोलीस कोठडीची मुदत संपल्यानंतर झालेल्या सुनावणीदरम्यान पोलिसांनी तपासासाठी आरोपींची समोरासमोर चौकशी करणे आवश्यक असल्याचे सांगत कोठडी वाढविण्याची मागणी केली. सोबतच तुरुंगात असलेला आरोपी गोलू मंगनाळेला हस्तांतरण वारंटवर आणून सर्व आरोपी समोर तपास करायचा आहे असा मुद्दा पोलिसांनी मांडला. बचाव पक्षाने मात्र इंदुताई मंगनाळे यांना कर्करोगाचा आजार असल्याने पोलीस कोठडी देऊ नये, असा युक्तिवाद केला. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने इंदुताई चंद्रविजय मंगनाळे यांच्यासह पाचही आरोपींना ११ एप्रिलपर्यंत एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.

# केळी उत्पादकांना हेक्टरी ७४ हजारांचा पीकविमा मंजूर

## आ. श्रीजया चव्हाण यांच्या पाठपुराव्याला यश

**नांदेड (प्रतिनिधी)**–मुदखेड, बारड आणि अर्धापूर महसुली मंडळातील केळी उत्पादक शेतकऱ्यांसाठी एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. गतवर्षी नैसर्गिक आपत्तीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान सोसाव्या लागलेल्या शेतकऱ्यांना पीकविमा अखेर मंजूर झाला असून, या मंडळांसाठी उच्च व निम्न तापमानाची भरपाई म्हणून एकूण हेक्टरी ७४ हजार ६७८ रुपये भरपाई जाहीर करण्यात आली आहे.

गतवर्षी जून महिन्यात झालेली अतिवृष्टी आणि वादळी वाऱ्यामुळे या तीनही मंडळातील सुमारे ४ हजार हेक्टरवरील केळी पिकाचे नुकसान झाले होते. त्याचप्रमाणे सलग पाच दिवस प्रतिकूल तापमानामुळेही शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. मात्र तापमानाची नोंद असूनही विमा कंपनीकडून तांत्रिक कारणास्तव शेतकऱ्यांचे दावे फेटाळले जात होते. यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली होती. दरम्यान, या शेतकऱ्यांनी भोकर विधानसभा मतदारसंघाच्या आ. श्रीजया चव्हाण यांची भेट घेऊन या विषयाशी त्यांना अवगत केले. त्यांनी या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांच्याशी चर्चा केली. तसेच विधानसभेत व राज्य शासनाकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा केला.

शेतकरी प्रतिनिधी तथा नांदेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक निलेश देशमुख (बारडकर) यांनी मुंबईत झालेल्या शासकीय बैठकीत या विषयावर ठोस पुराव्यांसह मांडणी करत शेतकऱ्यांचा दावा न्याय्य असल्याचे स्पष्ट केले. विशेष म्हणजे, स्वयंचलित हवामान केंद्रातील तापमानांच्या नोंदीतील विसंगती प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आली. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रकरणात हस्तक्षेप करत पुनर्विचाराचे आदेश दिले आणि अखेर शेतकऱ्यांच्या बाजूने निर्णय झाला. यापूर्वी केवळ ३२ हजार रुपये मंजूर करण्यात आले होते. मात्र पुनर्विचारानंतर आता बारड, मुदखेड, मालेगाव, मुगट, दाभड परिरातील शेतकऱ्यांना उच्च व निम्न तापमानासाठी हेक्टरी ७४ हजार ६७९ तर अर्धापूर व भोसी परिसरातील शेतकऱ्यांना उच्च तापमानासाठी हेक्टरी ४२ हजार ५०० रुपये मिळणार आहेत.

# चार्ली आणि रस्ता सुरक्षा पथकाचा प्रमाणपत्र देऊन सन्मान

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहरामध्ये मागच्या वर्षी सार्वजनिक रस्त्यावर तसेच वर्दळीच्या ठिकाणी केक कापून वाढदिवस साजरा करण्याचा पायंडा पडला होता. यात अनेक गुन्हेगारांचा सहभाग असायचा आणि त्यातून काही अनुचित प्रकार घडण्याच्या घटनासुद्धा घडल्या होत्या. तसेच ट्रिपल सीट, वेडी वाकडी दुचाकी चालविणे, फटाकेयुक्त बुलेट आणि हातात घातक शस्त्र घेऊन फिरणाऱ्या गुन्हेगारांवर वचक बसविण्यासाठी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी चार्ली पथक आणि रस्ता सुरक्षा पथक स्थापन करून या

पथकामार्फत गुन्हेगारांना हिसका दाखवला. दीड हजाराहून अधिक जणांना या पथकाचा प्रसाद खावा लागला. त्यामुळे मागील सहा महिन्यांपासून शहरात कुठल्याही सार्वजनिक रस्त्यावर वाढदिवस, बुलेटचा आवाज आणि रस्त्यावर दारू पिणाऱ्यांची संख्या कमी झाली आहे. यामुळे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी या पथकाचे प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक भागवत नागरगोजे व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांना प्रम ाणपत्र देऊन सन्मानित केले.

शहरामध्ये रस्त्यावर वाढदिवस साजरा करून गोंधळ घालण्याचा प्रयत्न, बुलेटच्या सायलेन्सरमध्ये बदल करून फटाकेयुक्त आवाज काढणे तसेच सार्वजनिक रस्त्यावर विशेष करून महिलांची ये-जा असणाऱ्या रस्त्यावर मद्य प्राशन करणे, हातात शस्त्र घेऊन फिरणे, बाहेर जिल्ह्यातील शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांना लुटणे, मोबाईल पळवणे आदी घटना सातत्याने घडत होत्या. अशा गुन्हेगारांना सुज्ञ नांदेडकरांनी विचारणा केल्यास ही मंडळी त्यांनाच धमकावत असत. या एकंदरीत बाबीचा अभ्यास करून पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी शहरात चार्ली आणि रस्ता सुरक्षा पथकाची नेमणूक केली.



या पथकामध्ये प्रत्येक पोलीस ठाण्यातील कर्मचारी आणि सध्या वाहतूक शाखेत कार्यरत असलेले सहायक पोलीस निरीक्षक भागवत नागरगोजे यांच्यावर ही जबाबदारी सोपवली होती. या पथकाने शहरात गस्त वाढवली. पाकीटमार, स्पा मसाज सेंटर, तलवार, खंजर, जबरी चोरी, पिस्तूल, वाहन कायद्याअंतर्गत, फरार, दारूबंदी अशा प्रकारच्या कारवाया केल्या. जवळपास दीड हजारांहून अधिक गुन्हेगारांना या पथकाचा प्रसाद घ्यावा लागला.

चार्ली पथक आणि रस्ता सुरक्षा पथकाची धास्ती गुन्हेगारांनी घेतली. यामुळे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी पथक प्रमुख भागवत नागरगोजे व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले. येणाऱ्या काळातही हे पथक याच ताकतीने शहरात नांदेडकरांच्या सुरक्षेसाठी तैनात राहील असा विश्वास भागवत नागरगोजे यांनी व्यक्त केला आहे.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com